जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# भिंगार येथील सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ

## पोलिस अधिक्षकांच्या हस्ते मानाच्या देशमुख गणपतीची उत्थापन पूजा

नगर - भिंगार येथील सार्वजनिक गणेश मंडळांचे गणेश विसर्जन २ दिवस आधी म्हणजेच द्वादशीला वामन जयंतीच्या दिवशी होत असते, तशी अनेक वर्षांची परंपरा असून त्यानुसार ४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता ब्राह्मण गल्लीतील मानाच्या देशमुख वाडा गणपतीची उत्थापन पूजा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आली, त्यानंतर गणेश विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला.

या उत्थापन पूजेचे पौरोहित्य प्रसाद कुलकर्णी यांनी केले याप्रसंगी देशमुख वाडा गणपतीचे विश्वस्त समीर देशमुख, कार्तिक देशमुख, प्रज्वल देशमुख, महेश कुलकर्णी तसेच हर्षद मुळे, शिवाजी राऊत, अनिल भोसले, प्रशांत गुजर, राजश्री गुजर, अमोल कोरे, रमेश तनपुरे, अमोल नागपूरे, ललित राऊत, अनिल मुळे, अवधूत देशपांडे, मोरेश्वर मुळे आदी उपस्थित होते

त्या नंतर दुपारी १.३० वाजता मिरवणुकीस प्रारंभ झाला. मिरवणूक ब्राह्मण गल्ली, गौळीवाडा, सदर बाजार, पाथर्डी रोड, दाणे गल्ली, मोमीन गल्ली, माळ गल्ली, सरपण गल्ली आणि पुन्हा ब्राह्मण गल्ली मार्गे जाऊन हनुमान मंदिराजवळील बारवात गणेश विसर्जन होईल. मानाच्या गणपतीचे विसर्जन सुर्यास्तापूर्वी ६ वाजेपर्यंत करण्यात येत असते. मानाच्या देशमुख वाडा गणपतीचे यंदाचे हे १०३ वे वर्ष आहे. १९२२ पासून सुरू झालेला हा उत्सव आजही पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. नेहमी प्रमाणे सनई चौघडा आणि रुद्रनाद ढोल पथकाचे वादन हे या मिरवणूकचे आकर्षण असते, ही माहिती देशमुख वाडा गणपतीचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी दिली. तसेच सायंकाळी सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ होणार असून यासाठी भिंगार कॅम्प पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.


भिंगार येथील ब्राह्मण गल्लीतील मानाच्या देशमुख वाडा गणपतीची उत्थापन पूजा करताना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व विश्वस्त मंडळ (छाया- बबलू शेख)

# गणेशोत्सवातील गर्दीत महिलेच्या मंगळसुत्राची चोरी

नगर - गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक गणेश मंडळांनी सादर केलेल्या देखावे खुले झाल्याने ते पाहण्यासाठी ३ सप्टेंबर रोजी रात्री शहरात मोठी गर्दी झाली होती. या गर्दीत महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना रात्री ८.३० ते ८.४५ वाजण्याच्या सुमारास माळीवाडा येथील विशाल गणेश मंदिरासमोर घडली.

याबाबत वैशाली दीपक देहरकर (वय ५१, रा. मिसाळ गल्ली, तेलीखुंट) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या गणेशोत्सवानिमित्त दर्शनासाठी माळीवाडा येथील विशाल गणेश मंदिरात गेल्या होत्या. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी सादर केलेल्या देखावे खुले झाल्याने ते पाहण्यासाठी शहरासह ग्रामीण भागातून गणेश भक्तांची मोठी गर्दी ३ सप्टेंबर रोजी शहरातील रस्त्यांवर झालेली होती. या वेळी विशाल गणेश मंदिर परिसरातही मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली होती.

या गर्दीत कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी देहरकर यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र कशाने तरी तोडले. मात्र त्याचा २० हजार रुपये किंमतीचा अर्धा भाग चोरट्याला चोरता आला. तर अर्धा भाग फिर्यादीच्या गळ्यातच अडकला. ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी चोरट्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र चोरटा गर्दीत पसार झाला. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात येवून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुध्द बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून मिरवणूक मार्गाची तपासणी


बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून मिरवणूक मार्गाची तपासणी करण्यात आली.

नगर - भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकाने (बीडीडीएस) मानाचा देशमुख गणपती मंदिर तसेच विसर्जन मिरवणूक मार्गाची बॉम्ब शोधक साहित्य व स्निपर श्वान जंजीर च्या मदतीने घातपात विरोधी तपासणी केली.

या पथकातील पोलिस उपनिरीक्षक अंबादास हुलगे यांच्यासह टेक्निशियन संजय येठेकर, दिनेश पळसकर, सुभाष पठारे, शरद वर्पे, अजय कदम, युवराज पवार यांनी गणेश विसर्जन मिरवणूक मार्ग ब्राम्हण गल्ली - मानाचा गणपती, भिंगार वेस, एमजी रोड, गवळीवाडा, सदर बाजार, कॅम्प पोलीस स्टेशन समोरुन अर्बन बँक, दाने गल्ली, भोईरे तालीम, मोमीन गल्ली, अंतिम चौक विसर्जन ठिकाण अमरधाम जवळील विहीर या मार्गावर ही तपासणी केली. यावेळी पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी या पथकाचे कौतुक केले.

# कोठी परिसरात मोकाट कुत्र्यांचा महिलेवर हल्ला; तर महानगरपालिकेतच कुत्रे सोडून आंदोलन कर

नगर - कोठी परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर होत असून नागरिकांना दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच परिसरातील सारसनगर भागातील गंगुबाई फुलारे या रस्त्याने जात असताना मोकाट कुत्र्याने त्यांच्या पायाला चावा घेतला. या घटनेत त्या जखमी झाल्या असून त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना घडताच कोठी परिसरातील स्वप्निल शिंदे यांनी तत्परता दाखवत जखमी महिलेला उपचारासाठी नेले.


गंगुबाई फुलारे या रस्त्याने जात असताना मोकाट कुत्र्याने त्यांच्या पायाला चावा घेतला.

शहरात वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या त्रासावर नियंत्रण आणण्यासाठी तातडीने कारवाई करण्यात यावी. शहरातील अनेक भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचा उच्छाद वाढला असून शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना रोज त्रास सहन करावा लागत आहे. महानगरपालिकेकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

८ दिवसांत मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त केला नाही, तर महापालिकेतच कुत्रे सोडून आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्वप्निल शिंदे यांनी दिला. दरम्यान, प्रशासनाने कुत्र्यांच्या लसीकरणासोबतच त्यांना आश्रयगृहात नेण्याची कार्यवाही तातडीने हाती घ्यावी, अशी मागणी केली आहे.

# जिल्ह्यात लेझर लाईट, दबाव हॉर्न आणि कार्बन डायऑक्साइड वायूच्या वापरावर ८ सप्टेंबरपर्यंत मनाईचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

नगर - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगणेशोत्सव व ईद-ए-मिलाद २०२५ या कालावधीत लेझर लाईट, दबाव हॉर्न (प्रेशर मिड) व कार्बन डायऑक्साइड वायूच्या वापरावर लागू राहतील. हे आदेश ३ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर २०२५ या कालावधीसाठी प्रभावी असतील.

जिल्ह्यातील मिरवणुकांमध्ये काही मंडळांकडून लेझर लाईट, दबाव हॉर्न (प्रेशर मिड) व कार्बन डायऑक्साइड वायूचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. या वापरामुळे मिरवणूक बघण्यासाठी जमलेल्या ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांच्या आरोग्य व सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

विशेषतः अशा साधनांच्या वापरामुळे मानवी श्वसन संस्थेला हानी पोहोचणे, हृदयाचे ठोके वाढणे, कानाच्या पडद्यांवर तसेच लहान मुलांच्या डोळ्यांवर बरे न होणारे दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. परिणामी सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होऊ शकते.

# महानगरपालिका प्रभाग रचनेत एवढे मोठे बदल कशाच्या आधारे?

## शिवसेनेचे माजी नगरसेवक योगीराज गाडे यांचा सवाल

नगर - अहिल्यानगर महापालिका प्रभाग रचना जाहीर झाली असून, या प्रभाग रचनेवर गंभीर शंका उपस्थित होत आहेत. २०१८ च्या निवडणुकीसाठी ज्या मार्गदर्शक सूचना व नियम लागू होते, तेच नियम या वेळीदेखील लागू आहेत, असे शासनाने स्पष्ट केले आहे. मग अशा परिस्थितीत, मागील वेळी प्रभाग रचना योग्य पद्धतीने झाली असताना यंदा एवढ्या मोठ्या प्रमाणावर बदल कशाच्या आधारावर करण्यात आले? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक योगीराज गाडे यांनी उपस्थित केला आहे.

२०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसारच ही प्रभाग रचना झाली असे सांगण्यात येत आहे. परंतु, नुकतीच नाशिक महानगरपालिकेची प्रभाग रचना जाहीर झाली असून, तेथे २०१७ साली असलेली प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली आहे. मग नाशिकसारख्या इतर महानगरपालिका जर मार्गदर्शक सूचना पाळून सातत्य ठेवत असतील, तर केवळ अहिल्या नगर महानगरपालिकेतच बदल का केले गेले?

यावरून स्पष्ट होते की, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांनी दबावाखाली येऊन कार्य केल्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून, शासन व निवडणूक आयोगाने या प्रभाग रचनेची पुनर्तपासणी करून, मार्गदर्शक सूचनांनुसार न्याय्य व पारदर्शक रचना करावी, अशी मागणी गाडे यांनी केली आहे.

### सुपा पोलीस स्टेशनमधील

# तरुणाच्या मृत्यू प्रकरणी शरद पवार यांना न्यायालयाकडून अटकपुर्व जामीन मंजूर

नगर - सुपा पोलीस स्टेशन येथे हितेशकुमार रविश्वर प्रसाद (रा. पनवेल) याचे मृत्यु प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०५ व ३ (५) अन्वये दाखल गुन्हयात उद्योजक शरद आबा पवार (रा. पवारवाडी, सुपा, ता. पारनेर) यांना येथील जिल्हा न्यायालयाने अटक पुर्व जामीन मंजुर केला आहे.

शरद पवार यांची सुपा येथे सिमेंट पाईपची फॅक्टरी आहे. तसेच हॉटेलही आहे. मयत हा पिकअप घेवुन त्यांच्या फॅक्टरीत चोरी करण्याच्या उद्देशाने आला होता. शरद पवार यांनी त्याचा कारने पाठलाग केला. मयतास पुणेचे बाजूस पळून जायचे होते. परंतु टोल नाक्यावर ट्रफिक जॅम असल्याने गाडी पुढे नेता येत नसल्याने तो उतरून टोलच्या केबीन मध्ये २३ जुलै रोजी पहाटे १.४५ वाजता गेला, तेथे त्याचा पाठलाग करत कारमध्ये आलेले लोक व शरद पवार असे टोलचे कॅबिनमध्ये गेले, तेथे काही जणांनी त्यास हाताने मारहाण केली.

शरद पवार यांनी फोन करुन पोलीसांना कळविल्याने पोलीस तेथे पहाटे २ च्या दरम्यान आले व मयतास सरकारी वाहनात घेवुन गेले. नंतर सकाळी सुपा येथील निरामय हॉस्पीटल येथे त्यास दाखल केले असता तेथे त्याचा मृत्यू झाला. शवविच्छेदनात डोक्याची कवटी फॅक्चर झाल्याचे आढळुन आले, शरद पवार व सहकारी यांनी पोलिस येण्यापुर्वी केलेल्या मारहाणीत मयताचा मृत्यु झाला म्हणुन सुपा पोलिसांनी शरद पवार व अन्य तिन जणांच्या विरोधात हा गुन्हा दाखल केला होता.

त्यामुळे शरद पवार यांनी अॅड. सतिशचंद्र सुद्रिक यांच्या मार्फत जिल्हा न्यायालयात अटक पूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अर्जदारातर्फे युक्तिवाद करण्यात आला की पहाटे २ पासून सकाळी ७ पर्यत मयत पोलिसांच्या ताब्यात होता. त्यांच्या ताब्यात असताना त्याचा मृत्यु झाला. परंतु जबाबदारी टाळण्यासाठी अर्जदार आरोपीच्या विरोधात खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. मयताच्या मृत्युस शरद पवार जबाबदार नाहीत हा अर्जदाराच्या तर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ग्राहय धरण्यात येवुन शरद पवार यांचा अटक पुर्व जामीन मंजुर करण्यात आला. अर्जदार शरद पवार यांच्या तर्फे अॅछड. सतिशचंद्र सुद्रिक यांनी काम पाहिले.

# किशोर रोकडे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - केडगाव येथील शाहुनगर परिसरातील रहिवासी किशोर रघुनाथ रोकडे (वय ४७) यांचे ३ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. त्यांचा केडगाव येथे लॉण्ड्रीचा व्यवसाय होता.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कापसावरील आयात शुल्कमाफी वाढविण्याच्या निर्णयाच्याविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अधिसूचनेच्या प्रतीची होळी, निदर्शने

## देशांतर्गत दर घसरुन आणि शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याचा आरोप

नगर - केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्कमाफीचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्याच्या घेतलेल्या निर्णयाला विरोध दर्शवून किसान सभेच्या वतीने ३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सदर अधिसूचनेच्या प्रतीची होळी करण्यात आली. या निर्णयाने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार असल्याचा आरोप करुन घोषणाबाजी करुन असंतोष व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात राज्य उपाध्यक्ष कॉ. बन्सी सातपुते, कॉ. अॅड. सुधीर टोकेकर, कॉ. बाबा आरगडे, सचिव कॉ. अप्पासाहेब वाबळे, प्रा. सुभाष ठुबे, कॉ. स्मिता पानसरे, प्रा. सुभाष कडलग, कॉ. अनंत लोखंडे, भारत आरगडे, सुलाबाई आदमाने, नारायण मेमाणे, प्रताप सहाणे, दशरथ हासे, सतीश पवार, सुनिल दुधाडे, धोंडीभाऊ सातपुते, मच्छिंद्र आर्ले आदी सहभागी झाले होते.

कापूस उत्पादक पट्ट्यातील शेतकरी विरोध करत असतानाही अर्थ मंत्रालयाने शुल्कमाफी वाढवली. या निर्णयामुळे ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या कापूस हंगामात आयात केलेल्या कापसामुळे देशांतर्गत दर घसरतील आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळणार नाही. गेल्या ११ वर्षांत कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) ने देशांतर्गत उत्पादनातील केवळ १३ टक्के खरेदी केली असून, ८७ टक्के शेतकरी खुले बाजारात तोट्यात कापूस विकण्यास मजबूर झाले आहेत. मोदी सरकार अमेरिकेच्या दबावाखाली काम करत असून, औद्योगिक मक्तेदार घराण्यांच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान करत आहे. किसान सभेच्यावतीने हा निर्णय शेतकरी समाजाचा अपमान असल्याचे स्पष्ट करुन देशभरात आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.



कापसावरील आयात शुल्कमाफी वाढविण्याच्या निर्णय विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अधिसूचनेच्या प्रतीची होळी करून निदर्शने करण्यात आली.

किसान सभेच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतातील कापड उद्योगाचा आकार तब्बल १५,१३,८५० कोटी रुपये इतका होता. त्यातील १२,३४,४०० कोटी रुपयांचा हिस्सा देशांतर्गत बाजाराचा होता, तर निर्यात बाजार केवळ ३,२१,९०० कोटी रुपयांचा होता. त्यातही अमेरिकेला जाणारी निर्यात फक्त २०,९८४ कोटी रुपये (१.५% पेक्षा कमी) इतकी आहे. त्यामुळे निर्यात संकट हा केवळ बहाणा असून, मक्तेदार व्यापाऱ्यांना स्वस्त आयात करून लाभ मिळवून देणे हा खरा हेतू आहे, असा आरोप करण्यात आला. फायदेशीर किमान आधारभूत किंमत (एमएसपी) सी२+५०% प्रमाणे न दिल्याने देशातील तब्बल ६० लाख कापूस शेतकऱ्यांचे सुमारे १८,८५० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना एमएसपी आणि कामगारांना किमान वेतन हमी दिल्यास देशांतर्गत क्रयशक्ती वाढेल आणि त्यामुळे निर्यात संकटावर मात करता येईल. तसेच हातमाग, यंत्रमाग आणि उद्योगांना स्वस्त कापूस पुरवून देशांतर्गत व्यापार वाढवणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले आहे. तर केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्कमाफीचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्याचा घेतलेला निर्णय मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पार्सल बुकिंगच्या स्वतंत्र काऊंटरचा अहिल्यानगर शहरामध्ये शुभारंभ

नगर - शहरातील सर्वच पोस्ट ऑफिसमध्ये सुरू असलेल्या बुकिंग सेवेसह आता दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रधान डाकघरातील कौलारु इमारतीत असलेल्या आर.एम. ऑफिसमध्ये स्वतंत्र काऊंटर सुरू करण्यात आला आहे. या काऊंटरचा शुभारंभ पुणे विभागाचे डाक निदेशक अभिजित बनसोडे यांच्या हस्ते नुकताच झाला.

या कार्यक्रमाला प्रवर अधीक्षक डाकघर विकास पालवे, वरिष्ठ पोस्टमास्टर हेमंत खडकेकर, गणेश वडूरकर, बाळासाहेब बनकर आदी उपस्थित होते.

डाक निदेशक अभिजित बनसोडे म्हणाले की, डाक विभागामार्फत आयटी २.० या नवीन प्रणालीसह हा काऊंटर सुरू करण्यात आला आहे. यामुळे बुकिंग सेवा अधिक जलद आणि सुलभ होणार आहे. ग्राहकांना दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत आपले आर्टिकल बुक करता येईल.

ते पुढे म्हणाले की, दिवसभराच्या व्यस्त वेळापत्रकामुळे जर ग्राहकांना नियमित वेळेत बुकिंग करता आले नाही, तरी या नव्या सुविधेमुळे त्यांना सहजपणे पार्सल बुक करता येईल. नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# सम्राट तरुण मंडळातर्फे १०० जोडप्यांच्या हस्ते महाआरती

नगर - शहरातील प्रसिद्ध व जुने मंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सम्राट तरुण मंडळ ट्रस्टने यंदा शंभरी पूर्ण केली आहे. शतक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात १०० जोडप्यांच्या हस्ते महाआरतीचा सोहळा पार पडला.

भिंगार कॅम्प येथील विशाल गणपती मंदिर प्रांगण भक्तांच्या गर्दीने फुलून गेले होते. सकाळपासूनच भक्तांच्या उपस्थितीत धार्मिक वातावरण निर्माण झाले. संपूर्ण मंडळाने १०० वर्षांचा प्रवास गाजावाजा न करता भक्तीमय उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्धार केला असून त्याचाच एक भाग म्हणून हा अनोखा उपक्रम पार पडला.



सम्राट तरुण मंडळात जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी नरेंद्र फिरोदिया आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाला जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी श्रींच्या चरणी नमस्कार करून महाआरतीत सहभागी होत भक्तांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनीही महाआरतीत सहभाग घेतला. तसेच भिंगार कॅम्प सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर, प्रमोद लहारे, गव्हाणे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रींची आरती होताच सभोवताली शेकडो भाविकांच्या आवाजात गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष घुमला.

विघ्नहर्त्याला, आयुष्यातली विघ्न संपत नाही, आलेली विघ्न त्याला तोंड देण्यासाठी जी शक्ती आहे. बळ श्रीगणेशाने द्यावे अशी प्रार्थना मी करतो, श्री गणेशसमोर मी नतमस्तक होतो. असे म्हणत पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी मत व्यक्त केले.

नरेंद्र फिरोदिया यांनी देखील शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. महाआरतीनंतर सामाजिक बांधिलकी जपत मंडळाने विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प केला. १०० वर्षांच्या प्रवासात मंडळाने केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान दिल्याची आठवण या वेळी करण्यात आली.

शतक महोत्सवाच्या निमित्ताने होणारे हे उपक्रम नगरकरांसाठी आकर्षण ठरत असून शिबिर महिलांसाठी अनेक उपक्रम मंडलाने केले. आगामी दिवसांमध्ये विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट - हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लॅंकेट, सोफा कव्हर्स, योगा मॅट, क्लिनिंग मटेरियल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

फोडणीकरिता किंवा गरम मसाल्याकरिता प्रत्येकाच्या घरी जिरे हे वापरले जाते. पण या जिऱ्याचा फक्त फोडणीपुरताच वापर नसून, गर्भवती महिलांनाही होतो. गर्भवती महिलांनी जिऱ्याचे पाणी पिणे हे त्यांच्या आरोग्याकरिता लाभदायक असते. जिऱ्याचे पाणी पिण्यासाठी आधी एक लिटर गरम पाण्यात एक चमचा जिरे टाकून ते उकळून घ्यावे. जेव्हा पाणी थंड होईल तेव्हा गाळून पिणे. जिऱ्यासकट पाणी पिऊ नये. जिरे शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी होऊ देत नाही.

जर आपण आपल्या वाढत्या वजनाने चिंतित आहात आणि आपल्याला वजन कमी करण्यासाठी योग करणे किंवा जिममध्ये जाणे शक्य नसेल तर एका सोप्या उपायाने आपण वजन कमी करू शकता. वजन कमी करण्यासाठी दालचिनीचे सेवन करावे. दिवसातून चार ते पाच वेळा दालचिनीचा लहान तुकडा चघळा. याने आपला लठ्ठपणा कमी होण्यास मदत होईल. दालचिनी चघळण्याने सतत गोड खाण्याची इच्छा होत नाही. याव्यतिरिक्त अवेळी लागणारी भूक आटोक्यात येते. ज्याने आपण फास्ट फूड किंवा इतर मसालेदार फूडपासून आपोआप दूर राहता आणि त्याचा परिणाम आपल्या वजनावर होतो.

## पाककला

### डोसा, पण उपवासाचा

**साहित्य** – बटाट्याची उपवासाची सुकी भाजी, अडीच वाट्या (तीन कप) वरईचे निवडलेले तांदूळ, जिरे अर्धा टि-स्पून, मीठ, तूप, मिरची.

**कृती** – वरई तांदूळ चार तास पाण्यात भिजत घाला. उपसून मिक्सरमधून बारीक करून घ्या. तसेच झाकून ठेवा. चार/पाच तासांनी त्यात जिरे, थोडी वाटून घेतलेली मिरची, मीठ घालून चांगले कालवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तूप पसरून घाला. नेहमी प्रमाणे जसे डोसे करतात त्याप्रमाणे करा. भाजत आल्यावर त्यावर आधीच तयार करून ठेवलेली बटाट्याची सुकी भाजी घाला. डोसा गुंडाळून मोठ्या डिशवर काढा.

## सौंदर्य

* प्रत्येक ऋतूमध्ये ओठ चांगले ठेवायचे असतील तर देशी गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात भिजवून ओठांवर चोळाव्यात. रात्री झोपताना पेट्रोलिअम जेली किंवा अँटीसेप्टिक क्रीम ओठांना लावल्याने ओठ फाटणार नाहीत.

* सकाळी उठल्यावर थकवा जाणवत असेल तर पाण्यात थोडे मीठ टाकून आंघोळ केल्याने रक्तपुरवठा सुधारतो व शरीराला आराम मिळतो. दीर्घ श्वास घ्या. काही सेकंदापर्यंत श्वास रोखून ठेवा.

## सल्ला

लसूण आरोग्यासाठी खूप उपयोगी व गुणकारी आहे. हृदयरोग तज्ज्ञ सांगतात रोज आहारात एक तरी लसणाची पाकळी हवी. अंकुरीत लसूण, फळे, धान्य यामध्ये अ‍ॅण्टीऑक्साईडची क्रिया जलद गतीने वाढत जाते.

## वास्तू

कुटुंब प्रमुखाने हॉलच्या मुख्य दरवाजाकडे तोंड करुन बसावे.

जर तुमच्या करियरमध्ये अडचणी येत असलीतल तर फेंगशुईनुसार उंट नोकरी, व्यावसायिक व आर्थिक अडचणींना दूर करण्यास मदत करतो. उंटाचे जोडपे कार्यालय वा घरात उत्तर-पश्चिमेत ठेवले तर धन येण्याचा वेग वाढतो व आर्थिक स्थिती उत्तम होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५

**प्रदोष, ईद ई मिलाद, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, श्रवण २३।३९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : परस्पर विश्वास हवा, गुंते सुटतील, चर्चा व ओळखीने कामे होतील. अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया नका घालवू.

**वृषभ** : शैक्षणिक संधी मिळेल, विकासात्मक कामांना वेग येईल, संतुलन हवे. सामाजिक स्नेह मेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील.

**मिथुन** : धावपळ टाळा, लोक वेळ वा शब्द पाळतील, परिचितात लाभ होईल. शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या तुम्हाला खचल्यासारखे वाटेल. थोडा आराम करा.

**कर्क** : वस्तू सांभाळा, कामे रेंगाळतील, दिवस आळसात जाईल. आयुष्याबद्दल उदार दृष्टीकोन तयार करा. वाहने सावकाश चालवावीत.

**सिंह** : परिचितांवर खर्च शक्य, प्रवास टाळा, हट्ट व आग्रह नको. तणावमुक्तीसाठी तुमच्या मुलांसोबत मौल्यवान वेळ घालवा. दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होतील.

**कन्या** : वेळ घालवू नका, नव्या क्षेत्रात शिरकाव होईल, वेगळेपणा भाव खाऊन जाईल. अत्यंत व्यस्त दिवस असला तरी आरोग्य चांगले राहील.

**तूळ** : कलेत रुची राहील. स्त्री वर्गाला लाभ, माता-पित्यांना ताण. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृश्चिक** : दुपारनंतर उत्तम विकास, कामात विलंब होणार, चर्चेचे गुऱ्हाळ राहील. आनंदाने खुशीने परिपूर्ण असा चांगला दिवस. नियोजनबद्धरित्या कामे केल्याने वेळ सत्कार्णी लागेल.

**धनु** : हेवे-दावे टाळा, स्वतः धावपळ करावी लागेल, नशिबावर अवलंबून नको. तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल.


**मकर** : आग्रही मत आणि अभ्यासू वृत्ती यश देणार आहे. वाद हे ठामपणे जिंकाल. अतिखाणे टाळा, तंदुरुस्त राहण्यासाठी हेल्थ क्लबला नियमित जा.

**कुंभ** : नवी वाट निवडाल. कर्जे देणे-घेणे टाळा. खरेदीत मन रमेल. गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

**मीन** : देणगीचे वा अनुदान याबाबतचे काम होईल. फसगती माणसे टाळा. मागील उधारी व उसनवारी वसुल होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२०४ सौ. शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) धर्मेंद्र, डिंपल कापडिया, अमरीश पुरी, अनुपम खेर यांचा एक चित्रपट ५) एक दिवंगत मराठी अभिनेत्री ७) शशी कपूर, आशा पारेख यांचा एक चित्रपट ९) ++ बुई मेट (चित्रपटाचे नाव) ११) राजेश खन्ना, श्रीदेवी यांचा एक चित्रपट १३) ऋशी कपूर, जुही चावला, अरबाजखान यांचा एक चित्रपट १६) राजेश खन्ना, हेमामालिनी, योगिताबाली, मेहमूद यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** शम्मी कपूर, संजीवकुमार, झीनत अमान, देवकुमर यांचा एक चित्रपट २) +++ कपूर (अभिनेत्री) ३) शरद कपूर, मुकुल देव, सुस्मिता सेन यांचा एक चित्रपट ४) आया +++ झूम के (चित्रपटाचे नाव) ६) ++ ++ आये बहुत याद आये (गाणे) ८) राजेश खन्ना, शर्मिला टागोर यांचा एक चित्रपट १०) +++ इंडिया (चित्रपटाचे नाव) १२) यात अमिताभ बचन आहेत १३) मिथुन चक्रवर्ती, आयेशा जुल्का यांचा एक चित्रपट १४) ++ कपूर (एक दिवंगत अभिनेता) १५) जो जीता वही सिकंदर (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : भीरुतेवर आत्म्याचा शानदार विजय हाच पराक्रम होय. **– एनियल.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### माणूस कोणकोणते अवयव दुसऱ्याला दान करू शकतो?

दानाचे माहात्म्य फारच मोठे आहे. अन्नदान, वस्त्रदान, तसेच आर्थिक मदत इत्यादींना आपल्या संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे. दानशूर कर्णाच्या गोष्टी तुम्ही वाचल्या असतीलच; परंतु या सर्व दानांपेक्षाही मौल्यवान असे दान सामान्यातला सामान्य माणूस देऊ शकतो. आश्चर्य वाटले ना? पण हे अगदी खरे आहे. हृदय, नेत्र, यकृत, मूत्रपिंड, अस्थिमज्जा, त्वचा इत्यादी अवयवांचे माणूस दुसऱ्याला दान करू शकतो. मेंदूचे कार्य थांबल्यास व्यक्तीला मृत समजावे, असा कायदा भारतीय संसदेने मंजूर केल्यामुळे इंद्रियदान करणे वा इंद्रियारोपण करणे शक्य झाले आहे.

डोळ्यात फूल पडल्याने वा जखम झाल्याने नेत्रपटल निकामी झालेल्या लोकांना मृत व्यक्तीचे नेत्रपटल बसवतात. यामुळे त्यांना दृष्टी प्राप्त होते. यालाच नेत्रदान म्हणतात. मूत्रपिंड खराब झालेल्या व्यक्तीचे जवळचे वा रक्ताचे नातेवाईक त्याला स्वतःचे मूत्रपिंड दान करू शकतात. सामान्यपणे सर्वसामान्यपणे व्यक्तींना दोन मूत्रपिंडे असल्याने त्यापैकी एक दान केले तरी एका मूत्रपिंडाच्या द्वारे आयुष्यभर कार्य केले जाते. साहजिकच एका रूग्णाचे प्राण वाचतात.

अपघातामध्ये मेंदूला जबर दुखापत झाल्याने मेंदू निकामी झालेल्या रुग्णाचे हृदय, नेत्र, यकृत, मूत्रपिंड असे अवयव काढून घेऊन गरजू रुग्णाचे प्राण वाचवता येतात. मरणोत्तर काही व्यक्ती देहदानही करू शकतात. यासाठी मरणोत्तर पोस्टमार्टेम झालेले नसावे. तसेच शरीरातील अवयव शस्त्रक्रियेने काढलेले नसावे. वैद्यकीय विद्यार्थ्यांना शरीररचना अभ्यासासाठी त्याची मदत होते. अस्थिमज्जा नष्ट झालेल्या व्यक्तींना अस्थिमज्जा दुसऱ्या निरोगी व्यक्तीने दान करावी लागते.

अशा प्रकारे माणूस अनेक अवयवांचे दान करू शकतो. काही जिवंतपणी तर काही मरणोत्तर. ''मरावे परी किर्तीरूपी उरावे.'' या उक्तीची प्रचिती या दानामुळे येऊ शकते.

### कोल्ह्याची युक्ती

सरतेशेवटी एक म्हातारा कोल्हा पुढे आले. तो खूप अनुभवी व विचारवंत होता. तो म्हणाला, ''मी अगदी साधा व सोपा उपाय सांगतो. आपल्याला त्या कोल्ह्याचे इंगित माहीत आहे. त्याच्या वर्मावर बोट ठेवले तर त्याला खाशी अद्दल घडेल. आपण खरे कोण आहोत, हे गर्वाने फुगलेला तो कोल्हा विसरला. त्या मूर्खाला त्याची जागी दाखवून दिलीच पाहिजे. मी सांगतो तसे करा. मग पहा त्याचे राज्य आणि तो जागेवर तरी राहतात का?''

यावर इतर जमलेल्या कोल्ह्यांनी विचारले, ''पण आजोबा, उपाय तरी कोणता करायचा?''

त्यावर आजोबा कोल्हा म्हणाला, ''तरुण कोल्ह्यांनो, अरे वाघ-सिंह त्याचा रंग पाहून फसले. तो कोल्हा आहे, हे त्यांना अजून कळले नाही. तो कोल्हा आहे हे वाघ-सिंहांना कळले, म्हणजे आपले काम झाले. आपण फसलो, हे ध्यानात येताच वाघ-सिंह चवताळून उठतील आणि कोल्ह्याच्या शरीराच्या चिंधड्या उडवतील.''

''मग आम्ही आताच जाऊन सांगतो की वाघोबांना आणि सिंहमहाराजांना!'' असे तरुण कोल्हे म्हणू लागताच कोल्हा आजोबा म्हणाला, ''तुम्हाला असा गाढवपणा करायची गरज नाही. फुकट जिवाला मुकाल. अरे, अंगावरचा पोशाख बदलला, म्हणजे स्वभाव थोडाच बदलतो? मूळ स्वभाव जात नाही. उद्या एखादा गाढव राजा झाला, तरी तो उकिरडा फुंकल्याशिवाय राहणार नाही की कुत्र्याला राजे केले, तर तो हाडूक चघळल्याशिवाय राहणार नाही. आपला कोल्होबाही असाच आहे. एखाद्या कोल्ह्याने कुई, कुई केले की सर्वच कोल्हे कुई कुई करायला लागतात. हाच कोल्ह्यांचा स्वभाव असतो. तेव्हा या राजा बनलेल्या कोल्ह्याचाही हा स्वभाव बदललेला नाही. म्हणून तुम्ही सर्वजण एकत्र जमून उद्या दरबारात हजर राहा आणि तेथे जोरजोराने 'कुई कुई' असे ओरडा. हे ऐकताच तो कोल्हाही 'कुई कुई' करायला लागेल आणि हे वाघोबाने आणि सिंहाने ऐकले, की कोल्ह्याचा घडा भरलाच म्हणून समजा! सारे काम बिनबोभाट होईल. आता आले ना ध्यानात?''

यावर सर्वांनी माना डोलावून संमती दिली.

पुढील घटना आजोबा कोल्हा म्हणाला होता, तशाच घडल्या, सारे कोल्हे ओरडू लागताच राजा बनलेला कोल्हाही आपण राजा आहोत हे विसरून कुई कुई करू लागला. हे पाहून आपण ह्याच्या बतावणीला फसलो, हे ध्यानात येताच एक सिंह भयंकर संतापला. एका उडीतच त्याने कोल्ह्याची मान पकडून त्याला ठार केले.

तात्पर्य : आपली योजना सोडून भलते साहस करायला गेले किंवा जन्मजात शत्रूशी लगट करायला गेले, की प्राणींवर बेतते.

## जीवन का अमृत (भाग १)



### गुरू और परमात्मा

जैसे-जैसे हम शब्द के साथ जुड़ेंगे, वैसे-वैसे हमारे कर्म भी कटते चले जायेंगे और हम ऐसी अवस्था में पहुँच जायेंगे, जिसमें हमारे सभी कर्मों का भुगतान हो जाएगा और हम परमात्मा से एकमेक हो जायेंगे। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

राखि लीए तिनि रखनहारि सम बिआधि मिटाई।।

वे यहाँ प्रार्थना कर रहे हैं कि ऐ राखनहार! ऐ रखवाले! सबकी रक्षा करने वाले परमात्मा! आपने मेरी रक्षा कर ली और जितनी भी मुझे बीमारियाँ थीं, दु:ख-दर्द थे, वे सब के सब मिटा दिये । जब हम किसी सतगुरू की शरण में पहुँचते हैं, तो वे हमारी रुहानी सेहत को ठीक कर देते हैं । जब हमें दु:ख-दर्द होता है, तो हम डॉक्टर के पास जाते है । डॉक्टर हमें दवाई दे देता है और उस दवाई से हमारे शारीरिक दु:ख दर्द दूर हो जाते हैं ।

जब हम किसी महापुरुष की शरण में आते हैं, वे क्या करते हैं? वे हमारी रूह के दर्दो की दवाई दे देते हैं। हमारी रूह को क्या क्या दर्द लगे हुए हैं? वह परमात्मा से दूर है, उसे प्रभु से बिछुड़े हज़ारों-लाखों-करोड़ों साल हो गए हैं और क्योंकि प्रभु से बिछुड़े हुए इतने साल हो गए हैं, प्रभु से न मिलने के बिछोड़े में हमारी आत्मा तड़प रही है और ८४ लाख जीव-योनि के चक्कर में लगे रहने के कारण इस पर बहुत से कर्मों का बोझ पड़ा हुआ है। इस प्रकार जब हम किसी सतुरु की शरण में पहुँचते हैं, तो वे हमारी रूहानी सेहत को तन्दुरुस्त बना देते हैं। संत कृपालसिंह जी महाराज फ़रमाया करते थे, 'On spiritual health depends the health of our body and mind,' रूहानी अवस्था पर ही हमारी मानसिक और शारीरिक अवस्था निर्भर करती है। अगर हमारी रूहानी अवस्था अच्छी होगी,

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

प्रकृति प्रदत्त पेड पौधों में पोषण की व्यवस्था जहाँ है, वहाँ पर ही की है । जमीन में जो है उसी में से जो चाहिए वह निर्माण करने की क्षमता पेड पौधों में नैसर्गिक ही है । आज वृक्षों की कटाई और रासायनिक खाद, तृणनाशक तथा कीटनाशक के इस्तेमाल से वनस्पतियों की पोषण व्यवस्था गडबडा गई है, जमीन शक्तिहीन बनी है । ऐसी जमीन को फिर से शक्तिशाली बनाने के लिए पेड पौधों का लगाना और जमीन में सेंद्रिय-जैविक खाद इस्तेमाल करना आवश्यक है । वर्तमान समय प्रकृति के साथ मिलजुलकर चलना बहुत आवश्यक है । इसके लिए आध्यात्मिकता का आधार लेना बहुत जरुरी है ।

सेंद्रिय और जैविक खाद बनाने के तरीके –

१) सबसे पहले ध्यान रहे की कोई भी फसल से अनाज निकालने के बाद जो अनावश्यक भाग (वेस्ट पार्ट) रहता है उसे जमीन के ऊपर फसल में आच्छादित करें या जमीन के अंदर मिला दें ।

जैसे फसलों की जडे, तना, घासफूस या धान का भूसा, गेहूँ का भूसा, मूंगफली के टरफल, गन्ने के पत्ते इत्यादि जमीन के ऊपर आच्छादित करें या हल चलाकर जमीन में मिला दें । इससे जमीन में सेंद्रिय पदार्थों का प्रमाण बढता है ।

२) जमीन में प्रति एकड कम से कम छ: टन गोबर की खाद डालना जरुरी है । इससे जमीन में जीवाणु स्थिर होते है ।

३) अगर गोबर की खाद उपलब्ध नहीं हो तो हरी खाद जमीन को देना आवश्यक है । इसमें- ताग - ५ किलो, ढैंचा - ५ किलो, मूंग - १ किलो, उडद - १ किलो, चना - १ किलो, मेथी - १ किलो, ज्वार - १ किलो, धनिया - १ किलो, चौलाई - २ किलो, पटसन - १ किलो, राजगिरा - २०० ग्राम

* यह सब बीज मिक्स करके एक एकड खेती में बुवाई करें । ४५ से ५० दिन में इस फसल को काटकर जमीन के अंदर मिला दें ।

* गन्ने और केले की फसल में हरियाली की फसल काटकर ऊपर से आच्छादित भी कर सकते है ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आई : बंड्या आज काय शिकवले शाळेत.
बंड्या : लिहायला शिकवले.
आई : अरे वा छान! काय लिहिले?
बंड्या : काय माहीत? अजून वाचायला नाही शिकवले....

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताच्या फलंदाजी प्रशिक्षपदी कोणाची नियुक्ती झाली?

– शितांशू कोटक

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

आपल्या मेंदुतील अँटिरियल पिट्युटरी कार्यान्वित होते. पिट्युटरी ग्रंथीच्या आदेशावर गर्भाशयाचे, बीजकोषांचे कार्य अवलंबून असते. या ग्रंथीच्या चालने मुळे बीजकोषांतून इस्ट्रिडिओल स्त्राव बाहेर पडतो. या स्त्रावामुळेच बालिकेचे स्त्रीमध्ये रुपांतर होते. तिच्यामध्ये शारीरिक व मानसिक बदल होतात.

''स्तनांमध्ये वाढ होणे, काखेत व मायांगावर केस येणे, शरीराला विशिष्ट प्रकारे गोलाई येणे, मांड्यांवरची चरबी वाढणे, शरीराला आकर्षक आकार प्राप्त होणे हे शारीरिक बदल घडतात; तर नटणे, मुरडणे, फॅशनेबल कपडे घालणे, सारखे आरशात बघावेसे वाटणे, मुलांबद्दल आकर्षण वाटणे, तर कधी कधी भीती वाटणे, राग निर्माण होणे हे मानसिक बदल होतात. श्वेता, या काळामध्ये जरा जपूनच वागावे. हे सर्व बदल शरीरातील बदलांमुळे होत असतात. त्यामुळे या काळात भांबावून जाऊ नये. आपले निर्णय योग्य आहेत ना, याचा विचार करुनच निर्णय घ्यावा. कुठल्याही शारीरिक आकर्षणाला बळी पडू नये. जर एखादा मुलगा किंवा पुरुष आपल्याशी वावगे वागत असेल, आपली छेड काढत असेल, तर त्याबद्दल आईला जरुर सांगावे. भावनेच्या भरात चुकीचे पाऊल पडले तर त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात.'' तिला चार्टद्वारे जननेंद्रियांची ओळख करुन देताना मदनध्वजाची देखील ओळख करुन दिली. ''हा भाग अतिशय संवेदनाक्षम असतो. त्यामध्ये असंख्य ज्ञानतंतू असतात, त्यामुळे त्याला स्पर्श केल्यास छान सुखावह वाटते.

म्हणून त्याला हात लावणे, कुरवाळणे या क्रिया नकळत होतात. परंतु कधीतरी नकळत एखाद्या व्यक्तीसमोर ही क्रिया घडली तर ते अतिशय वाईट दिसते. म्हणून अशा ठिकाणी हात लावणे टाळलेलेच योग्य असते बरं का? त्यानंतर मासिक पाळीच्या काळात घेण्याच्या शारीरिक स्वच्छतेचीही माहिती मी श्वेताला दिली. श्वेता, तुला एक सांगायचे म्हणजे मासिक पाळी सुरू झाल्यानंतर शारीरिक स्वच्छता ठेवावी. पाळीच्या दिवसांमध्ये रोज सकाळी गरम पाण्याने स्वच्छ अंघोळ करावी. यामुळे पोट, कंबर, पाय हे भाग शेकले जातात व त्या भागांतील वेदना कमी होऊन आरामदायी वाटते, योनिभागाची स्वच्छता राखावी. अंतर्वस्त्राच्या आतून मऊ, सुती कापडाची जाडसर घडी घ्यावी. परंतु ही घडी मागे-पुढे होऊ शकते, त्यापेक्षा बाजारात मिळणारे सॅनिटरी पॅड वापरावेत, ते अंतर्वस्त्राच्या आतून घट्ट बसवता येतात. त्यामुळे रोजची कामं करताना, खेळताना, सायकल चालवताना त्याची जागा शक्यतो बदलत नाही. सॅनिटरी पॅड हा मोठ्या आकाराचा, चांगल्या प्रतीचा वापरावा म्हणजे तो रक्तस्रावाचे व्यवस्थित शोषण करून घेतो. त्यामुळे कपड्यांवर डाग पडून चारचौघांत कानकोंडे होण्याची वेळ येणार नाही. काही जणींच्या बाबतीत, सुरुवातीला बीजकोषांमध्ये प्रत्येक महिन्याला बीजनिर्मिती होत नसल्याने सहा महिने ते एक वर्षे मासिक पाळी अनियमित असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन

## नि:स्वार्थ सेवेतून उमलणारे मानवतेचे दर्शन

समाजात प्रत्येक जण सारख्या संधींनी, सारख्या साधनसंपत्तीने, सारख्या सुखसोयींनी जन्माला येत नाही. कोणाकडे भौतिक संपत्तीची रेलचेल असते तर कोणाला दोन वेळचे जेवणही परवडत नाही. कोणाला शिक्षणाच्या संधी सहज उपलब्ध होतात तर कोणाला दारिद्र्यामुळे शाळेच्या दारातही पाऊल ठेवता येत नाही. कोणाकडे आधुनिक वैद्यकीय सेवा असतात तर कोण जीव वाचवण्यासाठी औषधांच्या अभावाने तडफडत राहतो. या असमानतेच्या जगात माणसाला माणसाचा आधार आवश्यक ठरतो. मानवाच्या इतिहासात जर काही मूल्ये शाश्वत ठरली असतील तर त्यामध्ये करुणा, सहानुभूती, मदतीची वृत्ती आणि नि:स्वार्थ सेवा या मूल्यांचा नक्कीच समावेश होतो. माणूस हा सामाजिक प्राणी आहे, ही संकल्पना केवळ समाजशास्त्रापर्यंतच मर्यादित नाही तर ती मानवी अस्तित्वाची मूलभूत अट आहे. माणूस एकटा जीवन जगू शकत नाही. त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त होतो तो एकमेकांच्या सहकार्याने, आधाराने, प्रेमाने आणि सेवाभावाने. धर्मादाय कार्य हीच त्या सहजीवन संस्कृतीची मूळ प्रेरणा आहे. याच भावनेच्या स्मरणार्थ दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' साजरा केला जातो.

दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जात असलेला हा 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिवस मदर तेरेसा यांच्या स्मृतिदिनाशी जोडलेला आहे. कलकत्त्याच्या गल्लीबोळांत निराधार, भुकेले, रोगग्रस्त, निराश्रित यांना त्यांनी उचलून घेतले. त्यांनी त्यांना केवळ औषधे वा अन्न दिले नाही, तर मातेच्या मायेने जिवाला आधार दिला. त्यांची सेवा नि:स्वार्थतेची खरी परिभाषा होती. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने १७ डिसेंबर २०१२ मध्ये ५ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली. या निर्णयामुळे धर्मादाय कार्याचे महत्त्व जागतिक स्तरावर अधोरेखित झाले. भारतीय संस्कृतीत धर्मादाय हा जीवनाचा अविभाज्य घटक राहिला आहे. आपल्या संस्कृतीत 'अन्नदानं परमं दानं' असे म्हटले आहे. धर्मादाय कार्य ही मानवी संस्कृतीतील नवी संकल्पना नाही. भारतीय संस्कृतीत तर ती अनादिकालापासून रुजलेली आहे. 'दान' हे जीवनमूल्य आपल्या परंपरेत विशेष महत्त्वाचे मानले गेले. अन्नदान, जलदान, विद्यादान, गोदान, भूमीदान अशा अनेक प्रकारांनी दानधर्म आपल्या समाजजीवनाचा पाया ठरला आहे. प्राचीन काळात राजा असो वा प्रजा, सर्वांनी आपल्याकडील थोडेफार साधनसंपत्ती समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करणे हे आपले कर्तव्य मानले. त्यामुळे धर्मादाय कार्य हा केवळ धार्मिक कृत्यांचा भाग नसून, तो मानवी जीवनशैलीचा अविभाज्य घटक बनला आहे. संतपरंपरेतील संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांसारख्या संतांनी परोपकाराचे महत्त्व सांगितलेले असून या तत्त्वाने आपले समाजजीवन समृद्ध झाले.

आजच्या आधुनिक जगात धर्मादाय कार्याची व्याप्ती आणखी विस्तृत झाली असून धर्मादाय कार्याने नवे आयाम घेतले आहेत. पूर्वीचे दान हे प्रामुख्याने वैयक्तिक पातळीवर होत असे; आता ते संस्थात्मक स्वरूपात विस्तारले आहे. हे कार्य केवळ धार्मिक वा पारंपरिक कृत्यापुरते मर्यादित न राहता शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, कौशल्यविकास, आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत सक्रिय झाले आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, अनाथ मुलांना निवारा, ग्रामीण भागात आरोग्यशिबिरे, अपंगांसाठी साधने, महिलांना स्वावलंबनासाठी मदत अशा असंख्य स्वरूपांत धर्मादाय कार्य पुढे येत आहे. स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संघटना, सामाजिक चळवळी, धार्मिक ट्रस्ट, तसेच औद्योगिक घराण्यांनी उभारलेले 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' उपक्रम या सगळ्यांनी धर्मादाय कार्याला नवीन दिशा दिली आहे. धर्मादाय म्हणजे केवळ पैशाची देणगी नव्हे, तर वेळ दान करणे, ज्ञान वाटणे, रक्तदान करणे, अवयवदान करणे, पर्यावरणासाठी झाडे लावणे, एखाद्या दु:खी व्यक्तीचे बोलणे शांतपणे ऐकणे हीसुद्धा धर्मादायाचीच रूपे आहेत. कधी कधी भावनिक आधार देणे हे भौतिक मदतीपेक्षा जास्त मौल्यवान ठरते. त्यामुळे धर्मादायाचा खरा अर्थ म्हणजे आपल्याकडील कोणतेही साधन नि:स्वार्थ भावनेने इतरांच्या हितासाठी वापरणे होय. जगभरात धर्मादाय कार्याने समाजाला दिलासा दिला आहे. आफ्रिकेत उपासमारीविरुद्ध लढणाऱ्या संस्था, युद्धग्रस्तांना मदत करणारे स्वयंसेवक, नैसर्गिक आपत्तींमध्ये धावून जाणारे कार्यकर्ते हे सर्व धर्मादाय वृत्तीचे उदाहरण आहेत. भारतातही पूर, दुष्काळ, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या आपत्तींच्या वेळी धर्मादाय संस्था पीडितांना मदत करतात. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात धर्मादाय कार्याची खरी ताकद दिसली. रुग्णांसाठी ऑक्सिजन, औषधे, अन्नधान्य पुरवणे, अंत्यसंस्कार व्यवस्थेत मदत करणे या सेवेमुळे लाखो जीव वाचले. धर्मादाय कार्याचे खरे सामर्थ्य समाजात दीर्घकालीन बदल घडवण्यात आहे. एका भुकेल्याला अन्न देणे आवश्यक आहेच; पण त्याला शिक्षण, रोजगाराची संधी देणे अधिक परिणामकारक ठरते. धर्मादायाने व्यक्तींना आत्मनिर्भर बनवले पाहिजे. दारिद्र्य, निरक्षरता, बेरोजगारी, विषमता कमी करण्यासाठी धर्मादाय कार्याने दीर्घकालीन उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.

आजची तरुणाई या कार्यात सक्रिय झाली आहे. 'रॉबिनहूड आर्मी'सारखे गट उरलेले अन्न गोळा करून भुकेल्यांपर्यंत पोहोचवतात. 'युथ फॉर सेवा'सारख्या संस्था ग्रामीण भागात आरोग्य आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देतात. महाविद्यालयीन विद्यार्थी 'राष्ट्रीय सेवा योजना' आणि राष्ट्रीय छात्र सेना' द्वारे गावोगावी जाऊन शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवतात. 'सोशल मीडियाच्या मदतीने निधी संकलन, रक्तदान मोहिमा, शैक्षणिक साधनांची उभारणी या उपक्रमांमध्ये युवकांची मोठ्या प्रमाणात भागीदारी दिसत असून हीच नवी पिढी धर्मादाय कार्याचा चेहरा बदलत आहे. तथापि, धर्मादाय क्षेत्रात काही आव्हानेही आहेत. काही संस्था निधीचा अपव्यय करतात, पारदर्शकता नसते, बनावट उपक्रम राबवले जातात. या सर्वांमुळे धर्मादाय कार्याची विश्वासार्हता डळमळते. म्हणूनच या कार्यात प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि पारदर्शकता आवश्यक आहे. धर्मादाय कार्य हे प्रसिद्धीच्या हव्यासापोटी नसून नि:स्वार्थतेच्या भावनेतूनच व्हायला हवे. धर्मादाय कार्याचा लाभ फक्त गरजूंनाच नाही, तर दान करणाऱ्यालाही होतो. दानातून मिळणारा अंत:करणातील आनंद, समाधान आणि शांतता हे पैशाने विकत घेता येत नाही. म्हणूनच धर्मादाय हा केवळ सामाजिक कर्तव्य नसून जीवन जगण्याची एक अर्थपूर्ण पद्धत आहे.

'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' आपल्याला आठवण करून देतो की आपण या समाजाचे देणे लागतो आणि ते परत करण्याचा एक मार्ग म्हणजे धर्मादाय कार्य करणे होय. मोठ्या देणग्यांची आवश्यकता नाही; लहान कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवतात. वाढदिवशी रक्तदान करणे, सण-समारंभामध्ये गरीबांना अन्नदान करणे, वाचनालयासाठी पुस्तके देणे, एखाद्या अनाथ मुलाच्या शिक्षणाचा खर्च उचलणे अशा छोट्या छोट्या कृतींचे मूल्य अनमोल आहे. मदर तेरेसा म्हणत असत की, 'आपण जे करतो ते समुद्रातील एक थेंब आहे; पण त्या थेंबाशिवाय समुद्र अपूर्ण आहे.' आपण प्रत्येकाने आपापला तो थेंब दिला तर समाजात करुणा, समानता आणि माणुसकीचे खरे साम्राज्य निर्माण होईल. नि:स्वार्थ सेवेतून उमलणारे हे मानवतेचे दर्शनच जगाचे खरे वैभव आहे, आणि त्याच दर्शनाचा गौरव करण्यासाठी आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन आपल्याला अंतर्मुख करतो.



**- डॉ.राजेंद्र बगाटे**

**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**

**ईमेल** - bagate.rajendra4@gmail.com

# शिक्षक दिन!

५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते.

मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!



# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन : शिक्षक दिनाचे प्रणेते

## ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचे अधिष्ठान

भारताच्या सांस्कृतिक परंपरेत 'गुरु' हा सर्वोच्च मानाचा मानकरी मानला जातो. आपल्या जीवनात आई-वडिलांप्रमाणेच शिक्षक - शिक्षिकाही महत्त्वाची भूमिका बजावतात. ज्ञान देणारा, मूल्यांची जाण करून देणारा व योग्य दिशेने नेणारा शिक्षक समाजाच्या प्रगतीसाठी दीपस्तंभ ठरतो. हाच विचार अधिक दृढ करण्यासाठी भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. या दिवशी देशाचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ व उत्कृष्ट शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती असते.

डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी तामिळनाडूतील तिरुत्तनी येथे झाला. अल्पसंपन्न कुटुंबातून आलेल्या राधाकृष्णनांनी शिक्षणाच्या जोरावर जागतिक कीर्ती मिळवली. तत्वज्ञान विषयात त्यांनी केलेले संशोधन, विशेषतः भारतीय वेदांत परंपरेचे विवेचन, जगभर गाजले. त्यांच्या विद्वत्तेमुळे ते कलकत्ता, मैसूर व ऑक्सफर्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते कठोर नसून प्रेरणादायी होते. विद्यार्थ्यांना विचार करायला लावणे, प्रश्न विचारण्याची प्रेरणा देणे आणि जीवनमूल्यांचा स्वीकार करायला शिकवणे हेच त्यांच्या अध्यापन पद्धतीचे वैशिष्ट्य होते.

भारताच्या राजकीय जीवनातही त्यांनी मोठे योगदान दिले. ते १९५२ ते १९६२ या काळात भारताचे उपराष्ट्रपती आणि १९६२ ते १९६७ या काळात राष्ट्रपती होते. तरीही त्यांनी कधीही स्वतःला राजकारणी मानले नाही, ते आजीवन शिक्षक व तत्त्वज्ञच राहिले. त्यांच्या विद्यार्थ्यांनी एकदा आग्रह केला की त्यांचा वाढदिवस साजरा करावा. त्यावर डॉ. राधाकृष्णन म्हणाले - माझा वाढदिवस वेगळा साजरा करण्यापेक्षा जर हा दिवस शिक्षक दिन म्हणून देशभर पाळला गेला, तर मला अधिक अभिमान वाटेल. यापासूनच ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून ओळखला जाऊ लागला.

आजच्या विज्ञानयुगात मुलांच्या हातात माहितीचा अथांग सागर उपलब्ध आहे. मात्र योग्य ते निवडणे, ज्ञानाला संस्कारांची जोड देणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणे हे शिक्षकांचे कार्य कधीच कमी होऊ शकत नाही. डॉ. राधाकृष्णन यांची तत्त्वे याच बाबी अधोरेखित करतात. शिक्षक हा केवळ विषय शिकवणारा नसून जीवन घडवणारा शिल्पकार आहे.

शिक्षक दिनानिमित्त आपण आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. त्यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन आपल्याला जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रेरणा देतात. डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी शिक्षणातील मूल्यांना व जीवनातील संस्कारांना प्राधान्य द्यावे, हाच खरा शिक्षक दिनाचा संदेश आहे.

**- संदीप बांगर (शिक्षक), श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर, मो. ९६५७२२३३११**

# उझबेकीस्तान येथील आशियाई डेफ बुध्दीबळ स्पर्धेसाठी अहिल्यानगरच्या देवेंद्र वैद्य याची भारतीय संघात निवड



नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्णबधीर बुद्धिबळपटू देवेंद्र श्रीहरी वैद्य याची आशियाई बुध्दीबळ डेफ स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेली आहे. तसे पत्र त्याला अखिल भारतीय डेफ कौन्सिल, नवी दिल्ली यांचेकडून मिळाले आहे. २० ते ३० सप्टेंबर दरम्यान उझबेकीस्तान येथील ताशकंद शहरात ही स्पर्धा आयोजित केली आहे.

गतवर्षी क्वाललांपूर (मलेशिया) येथे झालेल्या स्पर्धेत त्याने भारताचे कर्णधारपद भुषवून संघास कांस्यपदक मिळवुन दिले होते. याही वर्षी तो चांगली कामगिरी करुन भारतास पदक मिळवुन देईल असा मानस देवेंद्रने व्यक्त केला आहे.


बुध्दीबळ संघात निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर बुध्दीबळ परिवाराने व क्रीडा प्रेमींनी आनंद व्यक्त करुन देवेंद्रला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत. देवेंद्र वैद्य आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी करत असून भारताचे प्रशिक्षक दर्शन क्षीरसागर आणि जयंत गोखले (पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली तो सराव करीत आहे.

नगर जिल्ह्यातील कर्णबधीर खेळाडू, बुध्दीबळ खेळाडू व तरुणांसाठी देवेंद्र वैद्य प्रेरणादायी व्यक्तिमत्व ठरत असून आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ते भारताचे नांव उज्वल करतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# गोकुळवाडीतील नागरिकांच्या मागणीची महावितरणने तातडीने घेतली दखल

## सुनील भोसले यांच्या पाठपुराव्याला यश





गोकुळवाडी येथील शिवराजे मित्र मंडळाच्यावतीने महावितरणचे तेलीखुंट पावर हाऊसचे वरिष्ठ अभियंता रोहन धर्माधिकारी यांचा सत्कार करुन त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. याप्रसंगी सुनील भोसले, सचिन बाबनी, सुरज गोंधळी, सोपान भंडारी, राम भंडारी, ज्ञानेश्वर भंडारी, विशाल व्यवहारे, महेश गोंधळी आदी.

नगर - गोकुळवाडी येथील सुनील भोसले यांनी काही दिवसापूर्वी तेलीखुंट पावर हाऊस येथील महावितरणचे वरिष्ठ अभियंता रोहन धर्माधिकारी यांच्याकडे गणेशोत्सवापर्यंत परिसरातील खाली आलेल्या विजेच्या तारा जोडणीबाबत नागरिकांसमवेत निवेदन दिले होते. त्याची दखल घेत अभियंता रोहन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहकाऱ्यांनी गोकुळवाडी परिसरामध्ये तातडीने धाव घेत दुरुस्तीची कामे करून येथील समस्या सोडविल्या.

महावितरण विभागाच्या सहकार्यामुळे व सुनील भोसले यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे आता याला यश आले असून याबद्दल गोकुळवाडी परिसरातील नागरिक व शिवराजे मित्र मंडळाच्या गणपतीच्या आरतीचा मान अभियंता रोहन धर्माधिकारी व सहकाऱ्यांना देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. महावितरणच्या सहकार्यामुळे आणि विघ्नविनाशक गणरायाच्या कृपेमुळे आमच्या वरील आलेले विघ्न टळले असल्याची प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी सुनील भोसले, सचिन बाबनी, सुरज गोंधळी, सोपान भंडारी, राम भंडारी, ज्ञानेश्वर भंडारी, विशाल व्यवहारे, महेश गोंधळी उपस्थित होते.

सुनील भोसले यांनी दिलेल्या निवेदनात गणपती उत्सवापूर्वी या धोकादायक वायर व होलटेज वायर दुरुस्ती तसेच उंच पोल बसविण्याची मागणी करण्यात आली होती.

# बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीचा १७ सप्टेंबरला शुभारंभ



बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

मुंबई - रेल्वेमार्गापासून कोसो दूर असलेले बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार असून यामुळे अनेक वर्षापासूनचे बीडवासियांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उर्वरित बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

बैठकीला महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक संजीव कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव श्री. दशपुते, सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव (परिवहन) राजेंद्र होळकर, रेल्वेचे मुख्य विद्युत अभियंता विनीत कुमार, रेल्वेच्या पुणे विभागाचे अप्पर विभागीय व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक मिलिंद हिरवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला, मुख्य अभियंता प्रशांत भेगडे आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बैठकीत सहभाग घेतला.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. रेल्वेने आतापर्यंत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी.

फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गावरील प्रलंबित कामे पूर्ण करावीत. बारामती रेल्वे स्थानकाच्या कामाला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्या. तसेच कामाला गती देऊन पुढील काळात सुसज्ज रेल्वे स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

**असा आहे अहिल्यानगर - बीड - परळी रेल्वे मार्ग :** रेल्वे मार्गाची एकूण लांबी २६१.२५ किलोमीटर, जमिनीचे एकूण भूसंपादन १८२२.१६८ हेक्टर, रेल्वे खालील एकूण पूल १३०, रेल्वे वरील पूल ६५, मोठ्या पुलांची संख्या ६५, छोटे पूल ३०२. द्वितीय प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ४८०५.१७ कोटी, प्रकल्पाच्या समप्रमाणात ५०:५० टक्के हिस्सा नुसार केंद्र व राज्य शासनाचा प्रत्येकी हिस्सा २४०२.५९ कोटी.

# शालेय जिल्हा कुस्तीत सुवर्णपदक पटकावून प्रियांका वाघमारेची विभागीय स्पर्धेसाठी निवड



शालेय जिल्हा कुस्तीत सुवर्णपदक पटकावून प्रियांका वाघमारेची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल दिलीप काकडे व प्राचार्या ज्योत्स्ना शिंदे यांनी तिचा सत्कार केला.

नगर - जिल्हा क्रीडा कार्यालयाने आयोजित केलेल्या महानगरपालिके-अंतर्गत. शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत सेंट सेवियर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी प्रियांका विजय वाघमारे हिने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सुवर्णपदक पटकावले आहे. विभागीय पातळीवर स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

याबद्दल सेंट सेवियर्सच्या शालेय समितीचे अध्यक्ष दिलीप काकडे व प्राचार्या ज्योत्स्ना शिंदे यांनी तिचा सत्कार केला. प्रियांका ही उत्कृष्ट चपळ कुस्तीपटू आहे. यापूर्वीही तिला अनेक स्पर्धांत बक्षिसे मिळाली आहेत. तिला क्रीडा शिक्षक जे. ए. पिंटो व पी. ए. जमधाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# मारहाण प्रकरणी ३ वर्ष सक्त मजुरी; प्रत्येकी ५ हजार रुपये दंडाची शिक्षा

नगर - पिंपळगाव उज्ज्ञैनी (ता. नगर) येथे ११ एप्रिल २०२१ ला दु. ४ वा. निकाळे कोंडीराम प्रेमाजी या वृद्धास मारहाण झाल्याची घटना घडली.

फिर्यादीच्या घराजवळ येण्या-जाण्याच्या रस्त्यावरून आरोपी अभिजित अशोक भिंगारदिवे, बाबा अशोक भिंगारदिवे, ऑगस्टीन रुबाब आल्हाट (सर्व रा.पिंपळगाव उज्ज्ञैनी) यांनी फिर्यादीस काठी, लाथा - बुक्क्यांनी मारहाण करून हात फ्रॅक्चर केला. या गुन्ह्यांतर्गत सर्व आरोपींवर एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरील केसमध्ये सरकार पक्षातर्फे ५ साक्षीदार तपासण्यात येऊन त्यांनी दिलेली साक्ष कोर्टाने ग्राह्य धरून ॲडिशनल चिफ ज्युडिशिअल जी.ए.ए शेख यांनी आरोपींना दोषी ठरवून ३ वर्ष सक्त मजुरी व प्रत्येकी ५ हजार रुपये दंडाची शिक्षा २ सप्टेंबर रोजी शिक्षा सुनावली. फिर्यादीतर्फे ॲड. नितिन विश्वनाथ जंबुरे, ॲड. भाऊसाहेब पंढरीनाथ फसले, ॲड. प्रज्ञा कंकाळ, ॲड. प्रियंका पेचे आणि सरकारी वकील श्रीमती एस.पी.घुले यांनी काम पाहिले.



**मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विद्यार्थांना अन्नदान**

मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त बाबावाडी अनाथाश्रम, टिळक रोड, अहिल्यानगर येथे विद्यार्थांना अन्नदान करण्यात आले आहे. यावेळी प्रअध्यक्ष ईश्वर पवार, स्वामी टाकळकर, धिरज पोखरणा, शुभम टाकळकर, सागर शर्मा, विकी नारंग, खुशाल पवार, हिमांशु साखला, समर्थ चव्हाण, अंकुश गोयल, गोर जाना, बाबावाडी संस्थेच्या कांबळे मॅडम आणि सर्व सदस्य उपस्थित होते.

# जि.प. तर्फे सचिन ठाणगे यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर



नगर - जिल्हा परिषदेतर्फे उत्कृष्ट कार्याबद्दल प्राथमिक शाळा धोत्रे खुर्द येथील सचिन बबनराव ठाणगे यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

सचिन ठाणगे हे पारनेर तालुक्यातील तिखोल येथील रहिवाशी असून दुर्गम आणि ग्रामीण भागातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेत कार्यरत आहेत. शाळेमध्ये पहिली ते चौथी इयत्तेपर्यंत वर्ग असून मेंढपाळ व्यवसाय करणाऱ्या पालकांची मुले शिक्षण घेतात.

**सुविचार** समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व या तीन तत्वावर आधारित जीवनमार्ग म्हणजे लोकशाही.

## दिनविशेष ०५ सप्टेंबर

१८५५ : 'पंत महाराज बाळेकुंद्री' आध्यात्मिक गुरू यांचा जन्म. (मृत्यू : १६ ऑक्टोबर १९०५)
१८६९ : 'फ्रिट्झ प्रेग्ल' सेंद्रिय पदार्थांच्या पृथक्करणासाठी रसायनशास्त्राचा नोबेल पारितोषिक मिळवणारे ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ यांचा जन्म. (मृत्यू : १३ डिसेंबर १९३०)
१८७५ : 'फर्डिनांड पोर्श्या' पोर्श्या मोटार कंपनी चे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू : ३० जानेवारी १९५१)
१९०५ : 'कार्ल डेव्हिड अँडरसनयांचा' नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जन्म.
१९२३ : 'किशन महाराज' प्रख्यात तबलावादक यांचा जन्म. (मृत्यू : ४ मे २००८)
१९२३ : 'ग्लेन बेल' टाको बेल चे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू : १६ जानेवारी २०१२)
१९२३ : 'कृष्णराव साबळे' महाराष्ट्र शाहीर यांचा जन्म.
१९२७ : 'अरुण कुमार चटर्जी' बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते यांचा जन्म. (मृत्यू : २४ जुलै १९८०)
१९३१ : 'श्याम फडके' नाटककार यांचा जन्म.
१९३८ : 'रायोजी नोयोरी' नोबेल पारितोषिक विजेते जपानी रसायनशास्त्रज्ञ यांचा जन्म.
१९४० : 'प्यारेलाल शर्मा' लक्ष्मीकांत–प्यारेलाल या जोडीतील संगीतकार यांचा जन्म.
१९५६ : 'जिझु दासगुप्ता' भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक यांचा जन्म. (मृत्यू : २१ डिसेंबर २०१२)
१९५८ : 'शक्ती कपूर' भारतीय चित्रपट अभिनेता यांचा जन्म.
१९६५ : 'चार्ली शीन' अमेरिकन अभिनेता यांचा जन्म.
१९७१ : 'किरण देसाई' भारतीय–अमेरिकन लेखक यांचा जन्म.
१९७४ : 'राहुल संघवी' भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
१९७६ : 'विवेक ओबेरॉय' चित्रपट अभिनेता यांचा जन्म.
१९९२ : 'साक्षी मलिक' भारतीय कुस्तीपटू यांचा जन्म.
वरीलप्रमाणे ३ सप्टेंबर दिनविशेष ३

३ सप्टेंबर दिनविशेष – मृत्यू :
१६५८ : 'ऑलिव्हर क्रॉमवेल' इंग्लंडचा राज्यकर्ता यांचे निधन.
१९४८ : 'एडवर्ड बेनेस' चेकोस्लोव्हेकियाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.
१९५३ : 'लक्ष्मण पर्वतकर' तबला, घुमट व सारंगीवादक यांचे निधन.
१९५८ : 'माधव केशव काटदरे' निसर्गकवी यांचे निधन. (जन्म : ३ डिसेंबर १८९२)
१९६७ : 'अनंत हरी गद्रे' वार्ताहर, संपादक यांचे निधन. (जन्म : १६ ऑक्टोबर १८९०)
१९९१ : 'फ्रँक काप्रा' अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक यांचे निधन.
२००० : 'पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर' स्वातंत्र्यसैनिक, गोवा विधानसभेचे पहिले सभापती यांचे निधन.
२०१४ : 'ए. पी. वेंकटेश्वरन' भारतीय राजकारणी यांचे निधन. (जन्म : २ ऑगस्ट १९३०)


## केसरी रसगुल्ले

**साहित्य : अर्धा किलो उडदाची डाळ, १०० ग्रॅम तांदूळ, एक किलो साखर, बुंदीचा रंग, तूप, चांदीचा वर्ख, केशरच्या काड्या.**

**कृती : डाळ व तांदूळ स्वच्छ धुवून ७–८ तास पाण्यात भिजत ठेवा. त्यानंतर पाणी काढून ते मिक्सरमध्ये वाटून घ्या. दूधात रंग टाकून चांगले फेटून घ्या. साखरचा एकतारी पाक करून त्यात इसेन्स व केशर टाकावे. जिलेबी बनवण्याच्या कापडात पेस्टला भरावे. तूप गरम करून त्यात जिलेबी सारखे घेरात ते टाकावे. दोन्ही बाजूने शेकून २ मिनिटासाठी साखरेच्या पाकात ठेवावे. चांदीचा वर्ख लावून गरमा गरम केशरी रसगुल्ले सर्व्ह करावे.**

# धम्माल मनोरंजन



### आडवे संकेत

१) जुनी इंद्राची राजधानी
४) xxx xx मग सांगितले
७) गोसाव्याजवळील आगटी
९) घर xxx असल्याचे लक्षात येताच त्याने अग्निशामक दलास फोन केला
१०) खरगोश
११) उंच ठेंगणा नव्हे असा
१३) स्वर्गीय दादा कोंडके यांचा एक चित्रपट
१६) क्षणभर टिकणारे
१७) धान्याची कणसे तुडवून दाणे काढण्याची पद्धत
१८) थडगे
२०) भित्रा, पळकाढ्या
२१) ओढा, प्रवृत्ती
२२) भंगट २५) फार गर्द
२६) निद्रा २७) थंडावा
२८) मनाला भुरळ पाडणारा
३०) योद्धा ३२) जिन्नस, वस्तू
३३) फजिती
३५) मुसलमानी वंदना
३७) अगदी सुरक्षितपणे, सुखरुप
४०) दारुविक्रेता
४१) पोळी लाटण्याचे साधन
४२) जुवा खेळणारा
४४) लग्न ४६) दड, बाजूला हो
४७) अखंड साधना
४९) जिंकणे विरुद्ध
५०) झाकण
५२) सकाळ
५३) अंग मोडून येणे
५४) मोर xxx म्हणून तुणतुणे नाचे ५५) पृथ्वी ५६) देह

### उभे संकेत

१) वार्धक्यहीन
२) ओकारी येईल अशी स्थिती
३) रात्रीला उगवणारी
४) एक प्रसिद्ध प्रवचनकार
५) डोक्यांना हे असते
६) लिहिलेला मजकूर
८) एक हिंदी चित्रपट
१०) एकजवळचा नातेवाईक
१२) ध्यान, लाख
१४) पती जिवंत नसला की हा शब्द पुढे लावतात
१५) एक तृणधान्य
१९) कारकिर्द, सत्ता२१) गोंधळ, किरकिर
२२) एक अक्षरगणवृत्त
२३) टाकाऊ वस्तू
२४) शेतातील फूलांची माला
२५) पेटणे २९) रोजगार
३१) राजा ३४) सूर्य
३५) हसविणारा ३६) पाण्यात पोहणे ३७) सापाचे पिल्लू ३८) लवकर ३९) भाकरी भाजण्याचे साधन ४१) तैरणे ४३) तऱ्हा, पद्धत ४५) उत्तराधिकारी

### पाक कला

#### साधे पराठे

साहित्य– गव्हाचे पीठ–दोन वाट्या, बेसन–एक वाटी ज्वारी पीठ/सोया पीठ–अर्धी वाटी, चवीनुसार मीठ, धने, जिरे, तिखट पूड प्रत्येकी–एक टी स्पून, हळद–अर्धा टीस्पून, तेल कृती– तेल वगळून इतर सर्व पदार्थ घालून कणीक घट्ट व एकजिनसी मळून घ्यावी. अखेर तेलाचा हात लावून एकदा मळावी. दहा मिनिटे झाकून ठेवावी. तोवर तवा तापवून घ्यावा. पूर्ण तापला की आच मंद करावी. पोळपाट कोरडा ठेवावा. त्यावर थोडी पिठी भुरभुरून घ्यावी. एक मध्यम आकाराचा कणकेचा उंडा करावा व लाटावा. जाडसर पोळीस तेल/तुपाचा हात लावावा. परत त्याची घडी करावी. (हीच घडी त्रिकोणी अथवा गोल घालून जर त्याच आकाराचा व जाडसर पराठा लाटला तर तो बहुपदरी व खुसखुशीत होतो) हा पराठा तव्यावर टाकावा. एका बाजूने लालसर झाला की तेल. सोडावे. उलथन्याने उलटून, परत दुसऱ्या बाजूस तेल सोडावे. कडा चांगल्या दाबाव्यात. सारण भरून करायचे पराठे वगळून, बाकीचे पराठे अशा प्रकारे करून घ्यावेत.


## STUDENT CAREER FOR MPSC EXAM



१) डोळ्याचा रंग कशावर अवलंबून असतो?
अ)शंकुपेशी ब)रजतकनिका क)दंडगोलाकृती पेशी ड)यापैकी नाही
२) मुळ वस्तूच्या हुबेहुब प्रतिकृतीस काय म्हणतात?
अ) बहुरुपीक ब) समजातीये क) हुमीओ मार्फ ड) होलोग्राम
३) खालीलपैकी कोणते एक पिक लागवडीसाठी महाराष्ट्रात सर्व हंगामामध्ये घेता येते? अ)गहू ब)तूर क)सूर्यफूल ड) हरभरा
४) राज्यपालास पदच्चुद करण्याची तरतूद कोणत्या देशाच्या घटनेवरुन घेण्यात आली?
अ)ऑस्ट्रेलियाब)अमेरिका क)कॅनडा ड) यापैकी नाही
५) पाणी किती सेल्सीअसवर गोठते?
अ)२५ अं.से. ब) ३२ फॅरनहिट क)–३२ फॅरनहिट ड) १ डि.सें.
६) मुडदूस या रोगाच्या उपचारासाठी कोणते औषध वापरतात?
अ)कॉडलिव्हर ऑईल ब)रिफामायसीन
क)सॅफ्रयमायसीन ड) सनफ्लावर ऑईल
७) श्वसनाची क्रिया खालीलपैकी कोणत्या तत्त्वावर आधारीत आहे? अ)ओव्हमच्या ब)बॉईलच्या क)पाश्चरच्या ड)न्यूटनच्या
८) दूरचित्रवाणी हा विषय कशाचे सुचीत आहे?
अ)राज्यसुची ब)केंद्रसुची क)स्वतंत्रसूची ड) समवर्त सुची
९) उपकरणांच्या उपयोगामुळे कोणते फायदे होतात?
अ)निरीक्षणाचे जतन ब)विस्तारीत निरीक्षण क)अचुकता ड)वरील सर्व
१०) जेव्हा दोन सदोष राशी समांतर असतात तेव्हा त्यांचा गुणाकार कसा असतो?
अ)तेवढाच राहतो ब)धन असतो क) ऋण असतो ड) शुन्य राहतो
११) हत्तीची सोंड म्हणजे वस्तुतः त्याचे नाक व खालीलपैकी कोणता अवयव होय?
अ) कपाळ ब)वरचा ओठ क)खालचा ओठ ड) तोंड
१२) आणीबाणीच्या काळात मुलभूत अधिकारांना स्थगीती दिली जाते ते भारतीय संविधानात कोणत्या इतर देशाच्या संविधानातून घेतले आहे?
अ)जर्मनी ब)थायलंड क)वेस्ट इंडिज ड) ऑस्ट्रेलिया
१३)केंद्र व राज्य सरकार यांच्यातील अधिक संबंध कोणी निश्चित करतो?
अ)नियोजन आयोग ब) अर्थमंत्रालय क)वित्त आयोग ड) पंतप्रधान
१४) क्लोरोफिलमधे खालीलपैकी काय असते?
अ)बेरियम ब)बोरियम क) कॅल्शिअम ड) मॅग्नेशियम
१५) मानवाच्या मोठ्या आतड्यात खालीलपैकी कोणते आदीजीव कायम वास्तव्य करत असतात?
अ)पट्टाकृमी ब)पॅरेशियम क)अमीबा ड)जंत
१६) खालीलपैकी कोणत्या रोग जंतुच्या वंश प्रकारामुळे हृदयाच्या झडपेला सुज येते?
अ)स्टेप्टोकॉक्स ब) सालमोनेला
क)कॉस्टेडियम ड)कोरिनीबॅक्टेरियम

**उत्तर: (१–ब), (२–क), (३–क),(४–ड),(५–ब), (६–अ),(७–ड), (८–ब ),( ९–ड), (१०–ड),(११–ब), (१२–अ), (१३–क),(१४–ड ), (१५–अ ),(१६–अ )**

### स्वस्तिक शब्दकोडे



**आडवे संकेत**
२) मुबईजवळील घाट
३) हे चक्र म्हणजे भारतरत्ना खालोखालचा पुरस्कार
५) जहाज उभे राहतात ते ठिकाण

**उभे संकेत**
१) मोठा हाहा:कार
२) एकेक कलम घेऊन
४) सीमा देवचे पती


### चारोळी

मला फक्त तुझा
कटाक्ष हवा होता
तो कटाक्षचं फक्त
आयुष्यभराचा ठेवा होता.

तुझ्या–माझ्या लग्नाला
जरी झाली वर्षे बीस
अजुनही भेटीसाठी
जीवं होतो कासावीस.

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन् २००२ में बनी इस फिल्म में हृत्विक रोशन, करीना कपूर और रानी मुखर्जी थे.
४) मोक्ष इस फिल्म का नायक. (सिर्फ सरनेम)
७) xxx मुखर्जी (गायीका)
८) अनिल कपूर, वहिदा रहेमान, दिलीप कुमार, रती अग्निहोत्री और अमरिश पुरी अभिनीत एक फिल्म.९) सन् १९९३ में दिपक बाहरी निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और रविना टंडन थे.१०) पाप का xx (फिल्म)
११) जिनत xx (नायीका)
१२) तेरे xx (फिल्म)
१३) xxx एण्ड मिसेस खिलाडी
१५) ओ xxx तेरे बिना भी क्या जीना.... (गाना)
१६) सन् २००२ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल और अक्षय खन्ना थे.
१८) जिस्म फिल्म का नायक.
२१) दिसी xxx (नायीका)
२२) सन् १९८० में बनी सितारा इस फिल्म की नायीका.
२६) कुछ xx कुछ मिठी (फिल्म)
२७) ग्रेसी सिंह की पहिली फिल्म.
२८) मनोज वाजपेयी, उर्मिला मातोंडकर, संजय पुरी और इशा कोपीकर की एक फिल्म.
२९) ये लाल रंग कब मुझे..... यह गाना इस फिल्म का है.

### उभे संकेत

१) आप xx अच्छे लगने लगे (फिल्म)
२) अमिताभ बचन और शत्रुघ्न सिन्हा की एक फिल्म.
३) सन् २००३ में बनी फिल्म खुशी की नायीका.
५) जितेंद्र, जयाप्रदा, श्रीदेवी और राज किरण की एक फिल्म.
६) सन् १९९६ में बनी प्रेमग्रंथ फिल्म के संगीतकार.
७) सन् २००२ में बनी तुमको ना भुल पाएँगे इस फिल्म का नायक.
८) दिवाना xxx (फिल्म)
१४) जीने की xx (फिल्म)
१५) xxx की सहेली (फिल्म)
१७) विनोद खन्ना, मिनाक्षी शेषांद्री और सोनु वालिया और राज बब्बर की एक फिल्म.
१८) बाजीगर इस फिल्म में बाबुलाल का किरदार किसने निभाया.
१९) सन् १९९९ में बनी लावारीस इस फिल्म का नायक.
२०) सन् १९९९ में बनी जय हिंद इस फिल्म के निर्देशक.
२३) इस फिल्म में अनिल कपूर और रानी मुखर्जी थे.
२४) सुनील शेट्टी की पहिली फिल्म.
२५) सन् १९९९ में सुनील दर्शन निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और करिश्मा कपूर थे.

### घरचा वैद्य

**कान वाहणे**

**१. तुळशीच्या पानांचा रस, आल्याचा रस, मध, कडू तेल समप्रमाणात मिसळून थोडे से सेंधा मीठ वाटून त्यात मिसळावे. हे मिश्रण बाटलीत भरुन ठेवावे. कोमट करुन २–३ थेंब कानात टाकल्याने कान वाहणे किंवा पिकणे यावर आराम येतो. २. लहान मुलांचा कान वाहत असेल तर लसणा बरोबर कडूलिंबाचा पाला पाण्यात उकळावा ज्या कानात त्रास असेल त्या कानात हे पाणी रात्री झोपताना २–३ थेंब टाकून कापसाचा बोळा घालावा. कान वाहणे थांबते. जोपर्यंत पूर्ण आराम येत नाही तोपर्यंत ही क्रिया रोज करावी.**

### विनोद



पाहुणेः हे घे राजू तुला बिस्कीट.
राजूः तुम्ही कित्ती चांगले आहात।
पाहुणेः पण मी तुला चांगला म्हणणार नाही.
राजूः बरोबर आहे. खोटं बोलणं ही कला सगळ्यांनाच येते, असं नाही.
..........................

आईः हे बघ अमीत, तू हात धुतलेस तर मी तुला एक चॉकलेट देईन. पाय धुतलेस तर दोन चॉकलेटस देईन.
अमीतः थांब आई. मी आंघोळच करून येतो. तो चॉकलेटचा डबा खाली ठेव.

### टिप्स

- ✔ मधाच्या बाटलीत तीन–चार काळे मिरे टाकले तर मधाला मुंग्या लागत नाही.
- ✔ चिकट–तेलकट भांडे घासताना त्यात थोडा व्हिनेगार टाकला तर चिकटपणा लवकर निघेल.
- ✔ वॉश बेसिंग धुण्यापूर्वी जर लिंबाची साल बेसिंगला चोळून ठेवली व नंतर बेसिंग धुतले तर स्वच्छ होऊन चकाकू लागेल.
- ✔ तांदूळ धुतलेले पाणी झाडांना घाला त्यामुळे झाडांची वाढ चांगली होते.
- ✔ फर्निचरला वाळवी लागू नये म्हणून ते अधून मधून उन्हात ठेवा.
- ✔ साखरेला मुंग्या लागू नये म्हणून त्या डब्यात चार पाच लवंगा टाका.
- ✔ कणिक आणि बोरीक पावडर एकत्र करून त्याचे गोळे बनवावे.

# अहिल्यानगर महानगरपालिका प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध

## अनेक प्रभागात मोठे फेरबदल; हरकती नोंदवण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

नगर – महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रत्येकी ४ सदस्यांचे १७ प्रभाग असलेली प्रारूप प्रभाग रचना आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली आहे. या बोल्हेगाव, भिस्तबाग, पाइपलाइन रस्ता, तसेच, केडगाव, बुरुडगाव रोडवरील प्रभागांमध्ये मागील प्रभागांच्या तुलनेत किरकोळ बदल करण्यात आले. मात्र, मध्य शहरातील प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल केले आहेत.

राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार जनगणनेचे प्रगणक गट न तोडता प्रभाग रचना केली असली, तरी काही प्रभागांची रचना नदी, ओढे, महामार्ग ओलांडून करण्यात आली आहे. यात प्रभाग ४ सर्वाधिक २२ हजार ४०५ लोकसंख्येचा, तर प्रभाग १५ सर्वात कमी १८ हजार ५३७ लोकसंख्येचा करण्यात आला आहे. प्रभाग रचनेत कल्याण रोड, तोफखाना, सर्जेपुरा, मंगलगेट, झेंडीगेट, नालेगाव, माळीवाडा, दिल्लीगेट, लालटाकी या मध्य शहरातील प्रभागात मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्यात आले आहेत. तर, सावेडी उपनगरातील सिव्हिल हडको, प्रोफेसर चौक, कुष्ठधाम रोड, झोपडी कॅन्टीन परिसर, कोठला या भागांचा समावेश आहे.

नवीन प्रभाग रचनेत कल्याण रोड, नालेगाव, झेंडीगेट, सिव्हिल हडको या भागातील प्रभागांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाले आहे. तोफखाना व माळीवाडा परिसरातील प्रभागाची रचनाही मोठ्या प्रमाणात बदलली आहे. त्यामुळे या भागातील काही माजी नगरसेवकांवर नवीन प्रभाग शोधण्याची वेळ येईल. सावेडीतील जुन्या प्रभाग पाच व सहाच्या रचनेतही काही प्रमाणात बदल झाले. या प्रभागातील सिव्हिल हडको परिसराचेही विभाजन झाले.

**मनपा संकेतस्थळावर प्रभाग रचना प्रसिद्ध :** ही प्रारूप प्रभाग रचना अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. तसेच प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा व प्रभागांची व्याप्ती, नकाशे नागरिकांना पाहण्यासाठी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आले आहेत. नागरिकांनी प्रभाग रचनेवर सूचना किंवा हरकती असल्यास १५ सप्टेंबर पर्यंत दाखल कराव्यात, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

### प्रभाग क्र. १ (एकूण लोकसंख्या २२,२३४)

**प्रभागाची व्याप्ती :** नागापूर गावठाण, आठरे पाटील पब्लिक स्कुल, डॉन बॉस्को, सोसायटी, जय मंगल नगर, सुमन कॉलनी, भिस्तबाग महाल परिसर, गावडेमळा, नंदनवननगर, पवननगर, बारस्करवस्ती, हुंडेकरी लॉन, सेल्स टॅक्स कॉलनी, वाणीनगर, यशोदानगर, माय सिनेमा, फणसेनगर, ढवणवस्ती, दक्षतानगर, कुशाबानगर, गोकुळनगर, सिमला हडको, पंचवटी नगर, अष्टविनायक कॉलोनी, कॉटेज कॉर्नर.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** नगर मनमाड रोड ते नागापूर गावठाण मनपा हद्दीने तसेच सावेडी वडगांव गुप्ता शिवेने कचरा डेपो ते सावेडी सर्वे. न. २९१ च्या पूर्व सीमेने दक्षिणेस सावेडी बुऱ्हानगर शिवेने जुना पिंपळगाव रोड पर्यंत.

**पूर्व –** पिंपळगाव रोड बुऱ्हानगर शिवेपासून तपोवन रोड पर्यंत ते पश्चिमेकडे बडे अव्हेन्यू इमारत पर्यंत ते १२ मीटर डी. पी. रोड ने पाईपलाईन हडको ते अंतर्गत रस्त्याने श्रीनाथ क्लिनिक पाईपलाईन रोड पर्यंत.

**दक्षिण –** श्रीनाथ क्लिनिक पाईपलाईन रोड ते भिस्तबाग चौक ते D MRT नाल्याने नगर मनमाड रोडने जुने हॉटेल सत्यम समोरील नाल्या पर्यंत.

**पश्चिम –** नगर – मनमाड रोड वरील जुने हॉटेल सत्यम समोरील नाला ते नगर मनमाड रस्त्याने कॉटेज कॉर्नर बोल्हेगाव फाटा ते नागापूर गावठाण मनपा हद्दीपर्यंत

### प्रभाग क्र. २ (एकूण लोकसंख्या २२,०१५)

**प्रभागाची व्याप्ती :** डोके विद्यालय, स्कॉलर क्लासेस, पद्मानगर, हुडको, मातोश्री मोटर्स, बहिनाबाई सोसायटी, दसरेनगर, संभाजीनगर, नित्यसेवा बस स्टॉप, हॉटेल चेतना, नामदेवनगर, दत्तनगर, सिध्देश्वरय्या कॉलनी, श्रीरामनगर, ऐश्वर्यानगर, हॉटेल गारवा, लक्ष्मीनगर, अक्षता कॉलनी, ज्ञानेश्वरनगर, श्रीकृष्णनगर, संदेशनगर, साईदिपनगर

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** उत्तर बडे अव्हेन्यू इमारत पासून पूर्वेस तपोवन रोडने छत्रपती संभाजी नगर रोडने सावेडी स.न. ६७ पर्यंत.

**पूर्व –** सावेडी स.न. ६७ ते छत्रपती संभाजी नगर रस्त्याने निसर्ग बंगल्यापर्यंत.

**दक्षिण –** छत्रपती संभाजी नगर रोड निसर्ग बंगला ते वीर सावरकर मार्गने जुना पिंपळगाव रस्त्या पर्यंत तिथून

**उतर –** जुना पिंपळगाव रस्त्याने एकविरा चौक पर्यंत ते पाईपलाईन रोड ते श्रीनाथ क्लिनिक पर्यंत.

**पश्चिम –** श्रीनाथ क्लिनिक पाईपलाईन पासून १२ मीटर डी. पी. रोड तपोवन रोड बडे अव्हेन्यू इमारत पर्यंत.

### प्रभाग क्र. ३ (एकूण लोकसंख्या १९,३८४)

**प्रभागाची व्याप्ती :** सहकारनगर, सहकारनगर, अभियंता कॉलनी, मॉडेल कॉलनी, वर्षा कॉलनी, कोहिनूर मंगल कार्यालय, पारिजात चौक, नवलेनगर, एल.आय.सी. कॉलनी, गजानन महाराज मंदिर, बी.एस.एन.एल. टेलिफोन एक्स्चेंज, समतानगर, रेस्ट हाउस, झालानी हॉस्पिटल, सि.क्यु.ए.व्ही., सिव्हील हडको कॉलनी, अहिल्यानगर महानगरपालिका कार्यालय, सिंधी कॉलनी.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** पाईपलाईन रोड मोरया मंगल कार्यालय ते पाईप लाईन रोड ने श्रीनाथ क्लिनिक ते एकविरा चौक पिंपळगाव माळवी रस्त्याने वीर सावरकर मार्ग पर्यंत ते वीर सावरकर मार्ग ने छत्रपती संभाजी नगर रोड पर्यंत.

**पूर्व –** वीर सावरकर मार्ग ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याने भरोसा सेल शेजारील पेट्रोल पंप पर्यंत.

**दक्षिण –** भरोसा सेल शेजारील पेट्रोल पंपाच्या उत्तर सिमेने व संरक्षण विभागाच्या उत्तर हद्दीने तारकपूर सिंधी कॉलनी मिस्कीन मळा नाल्याने नगर मनमाड रोड पर्यंत .

**पश्चिम –** नगर मनमाड रोड वरील मिस्कीन मळा नाल्यापासून उत्तरेस सावेडी पोस्ट ऑफिस कॉलोनी रस्त्यापर्यंत ते पूर्वेकडे भगत मळा ते सिव्हील हडको गणेश चौक ते नाल्याने टी.व्हि. सेंटर पर्यंत प्रोफेसर चौक ते सोनानगर चौक ते सहकार नगर रस्त्याने १२ मीटर डीपी रोड ने पाईप लाईन रोड मोरया मंगल कार्यालय पर्यंत.

### प्रभाग क्र. ४ (एकूण लोकसंख्या २२,४०५)

**प्रभागाची व्याप्ती :** दर्गादायरा, मुकुंदनगर, छोटी मरिअम मस्जिद, मिरज मस्जिद, डिस्ट्रीक्ट बँक, वॉटर टँक, दरबार चौक, मौलाना आझाद चौक, वाबळे कॉलनी, हमीद मंजिल, इस्लामपुर चौक, आएशा मस्जिद चौक, दानिश महल, इकरा एज्युकेशन आणि वेलफेअर सोसा., गोविंदपुरा गौरवनगर.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** छत्रपती संभाजी नगर रोड वन विभाग ते भिंगार शिवेने संरक्षण सिमेपर्यंत भिंगार व सौरक्षक विभागाच्या हद्दीने बुऱ्हानगर शिवे पर्यंत भिंगार बुऱ्हानगर शिवेने भिंगार स.न. २८८ च्या पूर्व कडील सीमेपर्यंत.

**पूर्व –** भिंगार स.न. २८८ च्या उत्तर हद्दीपासून भिंगार नगरदेवळे शिवेने दर्गा दायरा गावठाण.

**दक्षिण –** दर्गा दायरा गावठाण ते भिंगार शिवेने सर्वे नं. ३५१ मधील भाई दारीयासिंगजी गुरूद्वाराच्या मागील रस्त्याने फिटनेस प्लनेट ते पश्चिमेकडे अमान इमारत पर्यंत उत्तरेस दर्गा दायरा रस्ता ते दर्गा दायरा रस्त्याने यशवंत विद्यालय ते छत्रपती संभाजी नगर रोड पर्यंत.

**पश्चिम –** फकीरवाडा रोड ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याने वन विभाग मनपा हद्दीपर्यंत.

### प्रभाग क्र. ५ (एकूण लोकसंख्या १९,८९०)

**प्रभागाची व्याप्ती :** लालटाकी चौक, अप्पु हत्ती गार्डन, वहाडणे हॉस्पिटल, जोशीज कोहिनूर कोहिनूर टेक्निकल इंस्टीट्युट, सर्जेपुरा चौक, सिद्धार्थनगर, भगत मळा, सिंधी कॉलनी, प्रकाशपूर जिल्हा रुग्णालय, विराज कॉलोनी, जिल्हा न्यायालय, गोविंदपुरा, मुकुंदनगर, कराचीवालानगर गोकुळवाडी.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** ब्राकुमारीज पासून नाल्याने मनमाड रोड ते रोडने दक्षिणेस पत्रकार चौक नाला ते नाल्याने सी. क्यू. ए. व्ही. सी.क्यू.ए.व्ही.

च्या संरक्षण विभागाच्या दक्षिण सीमेने छत्रपती संभाजी नगर रस्त्याने फकीरवाडा रस्त्याने नवाज मंजिल पर्यंत.

**पूर्व –** नवाज मंजिल पासून दक्षिणेस अमान इमारत पर्यंत ते पूर्वेस फिटनेस प्लानेट जीम पर्यंत ते दक्षिणेस भाई दयासिंगजी गुरूद्वारा माघील रस्त्याने भिंगार हद्दीपर्यंत ते भिंगार हद्दीने पोटिंगर रोडने डी.एस.पी. चौक ते संभाजी नगर पुणे रोडने फलटण पोलीस चौकी पर्यंत.

**दक्षिण –** फलटण पोलीस चौकी ते कोठला माघील १५ मीटर डी. पी. रोड ने एस. टी. वर्क शॉप ते हत्ती चौक.

**पश्चिम –** हत्ती चौक ते अप्पू हत्ती चौक ते स्वास्थ मेडिकल ते सिद्धार्थ नगर गोगादेव मंदिर च्या पाठीमाघून रस्त्याने चंद्रमा इमारती पर्यंत ते उत्तरेस लक्ष्मिचंद इमारत ते पूर्वे कडे जाधव मळा कॉम्पौंड ने उत्तरेस लक्ष्मी प्रोव्हिजन स्टोअर ते स.न.२९१ च्या पूर्व हद्दीने उत्तरेस ब्रम्हकुमारीज माघील नाल्यापर्यंत

### प्रभाग क्र. ६

(एकूण लोकसंख्या १९,२२१)

**प्रभागाची व्याप्ती :** भिस्तबाग चौक, शिंदेनगर, वैदुवाडी, श्रमिकनगर, रावसाहेब पटवर्धन हॉल, डौले हॉस्पिटल, रासने नगर, प्रेमदान हडको, प्रोफेसर कॉलनी, ऑल इंडीया रेडीओ, नोबल हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, बिशप लॉईड कॉलनी, गॅलक्सी हॉस्पिटल, पोस्ट कॉलनी, गणेश चौक, सिव्हील हडको, भाग्योदय सोसायटी, अमित बँक कॉलोनी, बिल बदल पोलीस कॉलोनी, गुरुकृपा कॉलोनी, वैभव सोसायटी, रेणावीकर कॉलोनी, प्रतिभा कॉलनी.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** अहिल्यानगरी चौक ते सावेडी भिस्तबाग चौक शिवेने भिस्तबाग चौक ते मोरया मंगल कार्यालय पर्यंत.

**पूर्व –** मोरया मंगल कार्यालय ते १२ मीटर डीपी रोड ने सहकार नगर रस्त्या पर्यन्त ते सोना नगर चौक ते प्रोफेसर कॉलनी चौक ते टी. व्ही. सेंटर हडको चौकापर्यंत ते नाल्याने गणेश चौक ते भगत मळा.

**दक्षिण –** भगत मळा सिव्हील हडको ते पोस्ट कॉलनी नगर–मनमाड रस्त्या पर्यंत.

**पश्चिम –** पोस्ट कॉलनी ते नगर मनमाड रस्त्याने प्रेमदान चौक ते डौले हॉस्पिटल ते सावेडी स.न.०६ च्या सिमेवरुन जाणारा उझ्र रोड न अमित बँक कॉलनीचौकापर्यंत अमित बँक कॉलनीते जेष्ठ नागरिकांचा कट्टा ते बिल बदल पोलीस कॉलनीतील अंतर्गत रस्त्याने वैदुवाडी रस्त्यापर्यंत ते वैदुवाडी रस्त्याने अहिल्यानगरी चौक.

### प्रभाग क्र. ७

(एकूण लोकसंख्या १९,७७९)

**प्रभागाची व्याप्ती :** कराळे हेल्थ क्लब, मेघनंद रिसोर्ट, अ. नगर होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, आय.सी.एफ.ए.आय. नॅशनल कॉलेज, ऑक्सिलीअम कॉन्व्हेंट हायस्कुल, श्री सिध्दीविनायक कॉलनी,सावेडी बस स्टॉप, अश्मीरा नर्सरी, श्रीनाथ सोसायटी, सावेडी गांवठाण, गणपती मंदिर, साई कॉलनी, नाना नानी पार्क, महालक्ष्मी उद्यान, भिंगारदिवे मळा, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, बोरुडे मळा, जाधव मळा.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** कॉटेज कॉर्नर सीना नदी नगर नगर मनमाड रस्त्याने जुने हॉटेल सत्यम समोरील नाल्या पर्यंत तिथून नाल्याने डी–मार्ट पर्यंत ते पाईपलाईन रस्त्याने क्राऊन प्लाझा पर्यंत.

**पूर्व –** क्राऊन प्लाझा ते वैदुवाडी रस्त्याने उद्या हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याने बिल बदल पोलीस कॉलनीतील जेष्ठ नागरिकांचा कट्टा ते अमित बँक कॉलनीते १५ मीटर डी. पी. रोड ने नगर मनमाड रस्त्या पर्यंत नगर मनमाड रोड ने प्रेमदान चौक ते माऊली संकुल ते हॉटेल दामोदर पुलापर्यंत.

**दक्षिण –** हॉटेल दामोदर च्या दक्षिण कडील नाल्याने ब्रह्मकुमारी पर्यंत तेथील नवीन पुलावरून दक्षिणेस जाधव मळा रस्त्याने लक्ष्मी प्रोव्हिजन पर्यंत ते पश्चिमेस बालिकाश्रम रोड ते दक्षिणेस गौतम अपार्टमेंट पर्यंत तेथून पश्चिमेकडील रस्त्याने नालेगाव स. न. २८६ च्या दक्षिण सीमेने सीना नदी पर्यंत.

**पश्चिम –** नालेगाव स.न. २८६ पासून सीना नदी ने कॉटेज कॉर्नर पुलापर्यंत.

### प्रभाग क्र. ८

(एकूण लोकसंख्या १९,८१२)

**प्रभागाची व्याप्ती :** विठ्ठल रुक्मिणी टेंपल, पितळे कॉलनी, आदर्शनगर, भंडारी कॉलनी, साई गेस्ट हाउस, राघवेंद्र स्वामी मंदिर, काकासाहेब म्हस्के ज्युनिअर कॉलेज, अंकुर कॉलनी, काकासाहेब म्हस्के मेडीकल कॉलेज, एम.आय.डी.सी., आंबेडकर चौक, साईराजनगर, मारुती मंदिर, कातोरेनगर, रेणुकानगर, मनोलिलानगर, शनिधाम सुजय बाजार, अ.नगर शहर सहकारी बँक, म्हसोबा मंदिर गांधी नगर, कळमकर नगर

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** बोल्हेगाव स.न. ६० ते नागापूर बोल्हेगाव शिवेने नागापूर स.न.०९ पर्यंत ते एम. आय. डी. सी. हद्दीने ते निंबळक रोड पर्यंत ते नगर मनमाड रस्त्यापर्यंत.

**पूर्व –** निंबाळक रोड ते नगर मनमाड रस्त्याने कॉटेज कॉर्नर पुला पर्यंत सीना नदी ने बोल्हेगाव नालेगाव शिवेपर्यंत.

**दक्षिण –** सीना नदी ते बोल्हेगाव नालेगाव शिवेने मनपा हद्दीपर्यंत.

**पश्चिम –** बोल्हेगाव नालेगाव शिव ते मनपा हद्दीने बोल्हेगाव स.न. ६० च्या उत्तर हद्दी पर्यंत.

### प्रभाग क्र. ९

(एकूण लोकसंख्या २०,७५६)

**प्रभागाची व्याप्ती :** चाहुराणा खुव बु., सुडके मळा, योगदान आयुर्वेद हॉस्पिटल, लेंडकरमळा, गंधेमळा, सिद्धार्थ नगर, पाठक मळा, पोलीस निवासस्थान, खाकिदास मठ, रंगभवन,कॉस्मिक कॉलनी, बागरोजारेणाविकर कॉलनी, दातरंगेमळा,ठाणगेमळा, वारुळाचा मारुतीपरिसर, नीलक्रांती हरिजन वस्तीशिवाजी नगर, श्रीकृष्ण नगर, उद्धव अकॅडेमी.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** मनपा हद्द बोल्हेगाव नालेगाव शिवेने पूर्वेस सीना नदी पर्यंत

**पूर्व –** मनपा हद्द बोल्हेगाव नालेगाव शिवेपासून सीना नदीने दक्षिणेकडे नालेगाव स.न. २८६ च्या दक्षिण सीमेने बालिकाश्रम रोड वरील गौत अपार्टमेंट पर्यंत ते उत्तरेस स.न. २९१ च्या उत्तर सीमेपर्यंत ते जाधव मळा रोडने सिद्धार्थ नगर लक्ष्मि प्रोव्हिजन स्टोअर ते जाधव मळा कॉम्पौंड ने दक्षिणेस लक्ष्मीचंद इमरात ते चंद्रमा इमारतिच्या दक्षिणेकडून पूर्वेस वीर गोगादेव मंदिर चौक ते गोगादेव मंदिराच्या पाठीमाघून गोगादेव मंदिर चौक ते स्वास्थ हॉस्पिटल ते अप्पू हत्ती चौक ते सर्जे पुरा ते प्रियदर्शनी अपार्टमेंट.

**दक्षिण –** प्रियदर्शनी अपार्टमेंट पासून माघील १५ मीटर डी. पी. रस्त्याने दादासाहेब रुपवते विद्यालय ते ते सिद्धीबाग ते दिल्लीगेट ते गोगादेव मंदिर ते नेप्ती नाका ते बाळाजी बुवा विहिर ते सीना नदी वरील कल्याण रोड पुलाने सीना नदी पर्यंत सीना नदीने नालेगाव स.न.०३ दक्षिणेस बाजूस स.न. ११ पर्यंत ते उत्तरेस जाधव लॉन कल्याण रोड ते पश्चिमेस मनपा हद्दीपर्यंत.

**पश्चिम –** नगर कल्याण रोड पासून बायपास ने उत्तरेकडे पश्चिम हद्दीने बोल्हेगाव नालेगाव शिवेपर्यंत

### प्रभाग क्र. १०

(एकूण लोकसंख्या २२,३४४)

**प्रभागाची व्याप्ती :** मोहन बाग, सातभाई गल्ली, तोफखाना, बागडपट्टी, लोणार गल्ली, शेरकर गल्ली, पारनाईक गल्ली, बेलदार गल्ली, कॅम्प कौलारू, घास गल्ली, कोठला, शनी गल्ली, झेंडीगेट परिसर, सिव्हील हॉस्पिटल, एस. टी. डेपो, एस. टी. वर्क शॉप, कोठला, बापुशाह दर्गाह, मंगलगेट, हॉटेल मिलन, झेंडीगेट परिसर हवेली.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** मोहन बाग नानाजी मठने दादासाहेब रुपवते विद्यालय समोरील १५ मीटर डी. पी. रोड ने सर्जेपुरा प्रियदर्शनी इमारत ते हत्ती चौक ते एस.टी.वर्क शॉप ते रामवाडी पेट्रोल पंप ते कोठला रोड ने फलटण पोलीस चौकी पर्यंत.

**पूर्व –** फलटण पोलीस चौकी ते पुना रोड ने सरोष टाकी हॉटेल अशोका पर्यंत.

**दक्षिण –** सरोष पाणी टाकी ते झेंडीगेट रोडने रामचंद्र खुंट ते अडते बाजार रस्ता ते अडते बाजार ते डाळ मांडइ रोडने एम. जी. रोड ते चितळे रोडने चौपाटी कारंजा पर्यंत.

**पश्चिम –** चौपाटी कारंजा ते दिल्लीगेट ते मोहन बाग नानाजी मठ पर्यंत.

### प्रभाग क्र. ११

(एकूण लोकसंख्या २०,९०६)

**प्रभागाची व्याप्ती :** मन्युनिसिपल हरिजन वस्ती, देशमुख गल्ली, मानकर गल्ली, नालेगाव हडको, नालेगाव परिसर, रोहोकले गल्ली, वाघ गल्ली, अमरधाम, तुंगार गल्ली, टांगे गल्ली, गाडगीळ पटांगण, रंगार गल्ली, गुजर गल्ली, गांधी मैदान, नवी पेठ रोड, एम. जी. रोड, शहाजी गल्ली, पानसरे गल्ली, कापड बाजार, डाळ मंडळी, गंज बाजार, सराफ गल्ली, जुना दाने डबरा, झेंडीगेट परिसर

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** कल्याण रोड सीना नदी पुलापासुन ते नेप्ती चौक ते मुन्युसिपल हरीजन वस्ती गोगादेव मंदिर ते दिल्लीगेट ते चौपाटी कारंजा ते चितळे रोड ने तेलीखुंट चौक ते एम. जी. रोड ते अडते बाजार ते रामचंद्र खुंट ते ए वन बेकरी.

**पूर्व –** ए वन बेकरी ते दक्षिणेस मनपा – शाळा क्र. ४ डॉ. बाबसाहेब आंबेडकर चौक.

**दक्षिण –** डॉ. बाबसाहेब आंबेडकर चौक ते नालबंद मस्जिद ते जुना कापड बाजार रस्त्याने भिंगारवाला चौक ते नगर अर्बन बँक ते माणिक चौक ते तक्ती दरवाजा ते प्रभाकर पुस्तकालय शनी चौक ते विवेकानंद पुतळा ते अक्षदा गणपती मंदिर रस्त्याने जुने कोर्ट रस्त्यापर्यंत ते कर्डिले सोनोग्राफी ते कोर्टाच्या माघील बाजूने नवले यांचे घर झारेकार गल्लीने आयुर्वेद कॉलेज रस्त्यापर्यंत ते मलगी ने सीना नदी पर्यंत.

**पश्चिम –** मलगी ते सीना नदी ने नगर कल्याण रोड वरील ब्रिज पर्यंत.

### प्रभाग क्र. १२

(एकूण लोकसंख्या १८,८०४)

**प्रभागाची व्याप्ती :** झारेकर गल्ली, आयुर्वेद कॉलेज, शनी चौक, खाटिक गल्ली, बेग पटांगण, पंचपीर चावडी, माळीवाडा, भोकळे गल्ली, ब्राह्मण गल्ली, इवळे गल्ली, शेरकर गल्ली, खंडोबा पंतांची हवेली, डावरे गल्ली, ख्रिस्त गल्ली, हलवाई गल्ली, झेंडीगेट परीसर, डोसम जी आटा.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** सीना नदी मलगी ने आयुर्वेद कॉलेज रोड ते शनी मारुती मंदिर ते झरेकर गल्ली रस्त्याने कोर्ट गल्ली नवले घरापर्यंत ते कर्डिले सोनोग्राफी ते अक्षदा गणपती मंदिर रस्त्याने विवेकानंद पुतळा ते पुतळा ते प्रभाकर पुस्तकालय शनी चौक ते तक्ती दरवाजा ते माणिक चौक ते नगर अर्बन बँक ते भिंगारवाला चौक ते जुना कापड बाजार रोड ने नालबंद मस्जिद ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते मनपा शाळा क्र. ४.

**पूर्व –** मनपा शाळा क्र. ४ क्वरीमस्जिद चौक ते दक्षिणेस सेंट ऑना चर्च.

**दक्षिण –** सेंट ऑना चर्च ते धरती चौक ते हातमपुरा चौक ते बंगाल चौक ते जुनी वसंत टोकीज ते कौठीची तालीम ते पारगल्ली ने विशाल गणपती मंदिर ते माळीवाडा वेस ते महात्मा फुले शाळा ते आयुर्वेद कॉलेज ते सीना नदी पर्यंत.

**पश्चिम –** आयुर्वेद कॉलेज उदयान ते सीना नदी मलगी पर्यंत.

### प्रभाग क्र. १३

(एकूण लोकसंख्या १८,८८२)

**प्रभागाची व्याप्ती :** नवीन टिळक रोड परिसर, जुना टिळक रोड परिसर, वाडिया पार्क, जुने बस स्थानक, पारगल्ली, चंदूकाका सराफ, क्लेरा ब्रूस मैदान, सी.एस.आर. डी, धूत हॉस्पिटल, नियोजन भवन, आर.टी.ओ. ऑफिस, कोंबडीवाला मळा, इवळे मळा, कॉलोनी, नवजीवन कॉलोनी, राउत मार्केट यार्ड, चैतन्य मळा, एम. एस. सी. बी. ऑफिस, Y.M.C.A. ग्राउंड, सत्ता कॉलोनी, कृषी उत्पन बाजार समीति, आनंदधम, नंदनवन कॉलोनी, गणेशवाडी, no. 3 बस स्थानक, सुगंधी चाळ, झेंडीगेट परिसर, जी.पी.ओ. परिसर, शांतीनगर.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** सीना नदी आयुर्वेद उद्यान ते आयुवेद कॉलेज ते माळीवाडा वेस ते विशाल गनपती मंदिर ते पारगल्ली ने कवठीची तालीम ते जुने वसंत टोकीज ते बंगाल चौकी ते हातमपुरा चौक ते धरती चौक ते सेंट ऑना चर्च ते उत्तरेस क्वरी मस्जिद चौक ते मनपा शाळा क्र.०४ उत्तरेस ए वन बेकरी ते पूर्वेस सरोष पाण्याची टाकी हायवे पर्यंत.

**पूर्व –** सरोष पाणी टाकी ते एस.बी.आय.चौक चांदणी चौक ते सोलापूर रोड वरील ब्रिज नाल्याने कोंबडी वाला मळा ते सोलापूर रस्त्याने केदार वस्ती कडे जाणाऱ्या रस्त्याने शांती नगर ते मनपा हद्द.

**दक्षिण –** शांतीनगर मनपा हद्दपासून १२ मीटर डी. पी. रस्त्याने इवळे मळामधून जाणारा माळीवाडा स.न. ६४ व ६५ च्या सीमेवरून जाणाऱ्या रस्त्याने माळीवाडा स.न.८५ च्या हद्दीपर्यंत ते पश्चिमे कडे जाणाऱ्या डी. पी. रस्त्याने डेस्ट कार सर्विस ते जानकी मेडीकल ते नवीन सरसनगर पुलाने मार्केट यार्ड महात्मा फुले चौकापर्यंत ते कोठी रोड ने चाणक्य चौक ते सक्कर चौक ते लोखंडी पूल सिना नदी पर्यंत.

**पश्चिम –** सीना नदी लोखंडी पूल ते सीना नदीने काटवन खंडोबा रोड आयुर्वेद उद्यान पर्यंत.

### प्रभाग क्र. १४

(एकूण लोकसंख्या १९,८९४)

**प्रभागाची व्याप्ती :** व्याप्ती जिजामाता गार्डन, सारसनगर, आनंदधाम चर्च, भवानीनगर, माळीवाडा, आनंदऋषीजी हॉस्पिटल, हॉटेल उदयनराजे पॅलेस, माणिकनगर, भोसले आखाडा, शिल्पा गार्डन, बजाज शो रुम, विनायकनगर, मातोश्री जॉगींग पार्क, आय.सी.ए.आय. भवन, नक्षत्र लॉन, पोकळे मळा, अवसरकर मळा, भवान नगर, डॉक्टर कॉलोनी, आयटीआय पोलीटेक्नीकल कॉलेज, नामगंगा परिसर, शिवगंगा टोवेर, इवळे मळा

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** लोखंडी पूल सीना नदी ते सक्कर चौक कोठी रोड ने महात्मा फुले चौक ते सारसनगर रस्त्याने नवीन पुलावरून डेस्ट कार सर्विस सेंटर ते डी. पी. रोडने माळीवाडा स.न.८५ च्या पूर्वेकडील सीमेपर्यंत.

**पूर्व –** माळीवाडा स.न.८५ च्या दक्षिण सीमेपासून माळीवाडा स.न. ६४ व ६५ च्या सीमेवरून जाणारा १२च् डी. पी. रस्ताने नामगंगा रस्त्यापर्यंत ते सोलापुर रस्ता हद्दीपर्यंत.

**दक्षिण –** सोलापूर रस्ता ते मनपा सीमेने माळीवाडा स.न.५३ च्या उत्तर सीमेपर्यंत तिथुन मनपा हद्दीवरील १५ मीटर डी. पी. रस्त्याने माळीवाडा स.न. ४२ च्या पूर्व दक्षिण कोपर्यापर्यंत तसेच पुढे मनपा हद्दीने चाहुराना खुर्द स.न.४० च्या उत्तर हद्दीपर्यंत व पुढे मनपा हद्दीने माळीवाडा स.न. ४१ च्या दक्षिण हद्द ते खोकर नाला ते खोकर नाल्याने चाहुराना बुद्रुक स.न. ६३ पर्यंत.

**पश्चिम –** चाहुराना बुद्रुक स.न. ६३ च्या दक्षिण हद्द ते सीना नदीने स्टेशन रोड लोखंडी पुलापर्यंत.

### प्रभाग क्र. १५

(एकूण लोकसंख्या १८,५३७)

**प्रभागाची व्याप्ती :** भावनाऋषी सोसायटी, व्यंकटेश सोसायटी, प्रशांत सोसायटी, बालाजी सोसायटी, भृंगऋषी सोसायटी, शंकर महाराज मठ परिसर, आदर्श नगर, विद्या कॉलोनी, गडाळकर मळा, काटवन खंडोबा, संजय नगर, आगरकर मळा, रेल्वे कर्मचारी वसाहत, शिवाजी नगर, रभाजी कोतकर नगर, कारमेल स्कूल, औद्योगिक वसाहत

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** कल्याण रोड बायपास हद्दीपासून पुर्वीकडे जाधव लौन्स पर्यंत ते पूर्व बाजूच्या रस्त्याने दक्षिणेस डी. पी. रोड पर्यंत ते पूर्वेस डी. पी. रोडने सीना नदी मलगी पर्यंत.

**पूर्व –** मलगी पासून सीना नदीने काटवन खंडोबा रस्त्यावरील पूल ते सीना नदीने स्टेशन रोड वरील लोखंडी पुला पर्यंत.

**दक्षिण –** स्टेशन रोड वरील लोखंडी पूल सीना नदी ते स्टेशन रोडने बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ते उप मुख्य अभियंता कार्यालय रेल्वे विभाग ते नगर पुना रोड ते नगर पुणे रस्त्याने नालेगाव स.न.५२ व ५४ च्या मधून जाणारा १८ मीटर रस्त्याने केडगाव लिन्क रोड पर्यंत ते लिंक रोड ने सुजय अपार्टमेंट पर्यंत ते शंकर महाराज रोडने केडगाव स.न. १७ च्या अंतर्गत रस्त्याने माय ब्युटी अकॅडेमी पर्यंत केडगाव स.न. २२ रेखांकनातील अंतर्गत रस्त्याने केडगाव च्या स.न. २२ च्या उत्तर सीमेवरील १८ मीटर च्या रुंदीच्या रस्त्यापर्यंत ते १८ मीटर डी. पी. रोडने केडगाव स.न.३० मधील ओपेन स्पेस मधील पाण्याच्या टाकी पर्यंत तसेच अंतर्गत रस्त्याने नेप्ती रोडने बायपास चौका पर्यंत.

**पश्चिम –** केडगाव स.न.३३ च्या दक्षिण सीमा ते केडगाव बायपास रस्त्याने नगर कल्याण रस्त्या पर्यंत.

### प्रभाग क्र. १६

(एकूण लोकसंख्या २२,१६३)

**प्रभागाची व्याप्ती :** केडगांव गावठाण भुषणनगर, हॉटेल रंगोली, शिवाजी नगर, वैष्णव नगर, एकनाथ नगर, राभाजी नगर, शाहू नगर, अंबिका नगर, खाटिक मळा, रेणुका नगर, टाटा मोटोर्स, सुखसागर हॉटेल, झेंडा चौक.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** नेप्ती रोडने बायपास चौकापासून केडगाव बायपास केडगाव स.न.४९२ च्या पश्चिम हद्दीपासून नेप्ती रोड केडगाव स.न.३० च्या रेखान्कानातील अंतर्गत रस्त्याने पाण्याच्या टाकीपर्यंत ते १८ मीटर डी. पी. रस्त्याने केडगाव स.न. २२ च्या रेखांकनातील अंतर्गत रस्त्याने शिवाजी नगर रोड माय ब्युटी पार्लर पर्यंत ते शिवाजी नगर रोडने दोन टाकी पाण्याच्या पर्यंत ते सुजय अपार्टमेंट पर्यंत.

**पुर्व –** सुजय अपार्टमेंट ते लिंक रोड ने हॉटेल रांगोली नगर पुणे रोड पर्यंत.

**दक्षिण –** लिंक रोड हॉटेल रंगोली ते नगर पुणे रस्त्याने हॉटेल अर्चना ते हॉटेल संदीप ते केडगाव बायपास ते मनपा हद्द स.न.४५३ च्या पश्चिम सीमेपर्यंत.

**पश्चिम –** नगर पुणे रोड केडगाव स.न.४५३ ते मनपा हद्दीने कांदा मार्केट पर्यंत ते केडगाव स.न.४९२ च्या उत्तर सीमेवरील नेप्ती रोड पर्यंत.

### प्रभाग क्र. १७

(एकूण लोकसंख्या १९,७२९)

**प्रभागाची व्याप्ती :** हॉटेल यश ग्रांड, इलाक्षी शोरूम, कायनेटिक चौक परिसर, खैरे चाळ, प्रियांका कॉलोनी, पांजरपोळ, सुखकर्ता कॉलोनी, अंबिका विद्यालय. केडगाव देवी परिसर, इंदिरा नगर, हनुमान नगर, एकता कॉलोनी, मोहिनी नगर, पाच गोडाऊन परिसर, लोंढे मळा, दुधसागर सोसायटी, एफ. सी. आय. गोडाऊन, तारा बाग कॉलोनी, साई श्रुती पार्क.

**प्रभागाच्या सीमा**

**उत्तर –** केडगाव स.न.४५२ च्या हद्दीपासून नगर पुणे रस्त्याने बायपास रोड ते हॉटेल संदीप ते हॉटेल रंगोली ते कायनेटिक चौक ब्रिज खालील मुख्य उपभियांता कार्यालय रेल्वे विभाग ते बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ते मल्हार चौक ते लोखंडी पूल सीना नदी पर्यंत.

**पूर्व –** स्टेशन रोड लोखंडी पूल ते सीना नदीने नगर पुणे रस्ना रोड सीना नदीने चाहुराना बुद्रुक स.न. ६१ पर्यंत ते मनपा हद्दीने दौंड रोड केडगाव स.न. १९७ पर्यंत.

**दक्षिण –** केडगांव स.न. १९७ च्या पूर्व हद्दीपासून केडगाव अरणगाव शिवेवरील २४ मीटर डी. पी. रस्त्याने केडगाव बायपास पर्यंत ते केडगाव स.न.३४६ च्या पश्चिम हद्दीपर्यंत (मनपा हद्दीपर्यंत).

**पश्चिम –** केडगाव स.न.३४६ ते केडगाव चास शिवेनेरी नगर पुणे रोड केडगाव स.न.४५२ पर्यंत.

